पाक्षिक
# मनोगत
प्रदेश बीजेपी

मुंबई ● वर्ष: 7 ● अंक: 13 ● 1 जुलै 2025 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.

# भारतीय जनता पार्टी हीच माझी ओळख





## अध्यक्षीय मनोगत

# नव्या नेतृत्वाचे स्वागत

भारतीय जनता पार्टी हा लोकशाही प्रक्रियेनुसार चालणारा पक्ष आहे. गावपातळीपासून ते राष्ट्रीय पातळीपर्यंतचे पदाधिकारी पक्षांतर्गत निवडणुकीच्या प्रक्रियेद्वारे निवडले जातात. आपल्या पक्षात घराणेशाहीला स्थान नसल्यामुळे आपला पक्ष काँग्रेस किंवा अन्य प्रादेशिक पक्षांप्रमाणे एका कुटुंबापुरता मर्यादित नाही. काँग्रेस व काही प्रादेशिक पक्षांमध्ये एका कुटुंबाचीच सत्ता चालते. या कुटुंबांच्या बाहेर सरकार व पक्षातली सत्ता पदे सामान्य कार्यकर्त्यांच्या वाट्याला येत नाहीत. या कुटुंबांतील सदस्यांच्या मर्जीवर सत्तापदांची खिरापत वाटली जाते. भारतीय जनता पार्टीमध्ये मात्र एखाद्या कार्यकर्त्याने पक्षासाठी दिलेले योगदान पाहून त्याला सरकार आणि पक्षामध्ये काम करण्याची संधी दिली जाते. त्यामुळेच कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना नरेंद्र मोदी, अमित शाह या सारख्या अनेक कार्यकर्त्यांना केंद्रातील सर्वोच्च सत्तापदावर काम करण्याची संधी मिळाली. पक्षाच्या प्रदेश अध्यक्षपदी नुकतीच निवड झालेले रवींद्र चव्हाण हेही सामान्य कौटुंबिक पार्श्वभूमी असलेले कार्यकर्ते आहेत. युवा मोर्चाचे कार्यकर्ते म्हणून काम करण्यास सुरुवात केल्यानंतर युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष, नगरसेवक, आमदार, मंत्री, प्रदेश सरचिटणीस आणि प्रदेश अध्यक्ष असा त्यांचा आजवरचा राजकीय प्रवास आहे. पक्षाने सांगितलेले काम, दिलेली जबाबदारी इमानेइतबारे पार पाडताना पदाची कोणतीही अपेक्षा न ठेवणारा कार्यकर्ता हा भाजपाचा निष्ठावान कार्यकर्ता समजला जातो. अशा लाखो निष्ठावान कार्यकर्त्यांच्या बळावरच भारतीय जनता पार्टी आज जगातील सर्वात मोठा पक्ष बनला आहे. श्री. चव्हाण यांनी कोकण विभागात पक्षाचा विस्तार करण्यासाठी मोठी मेहनत घेतली आहे. कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रात श्री. चव्हाण यांनी अनेक सहकाऱ्यांच्या मदतीने लढाऊ कार्यकर्त्यांची फळी तयार केली आहे. मंत्री म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन पक्षाने त्यांच्यावर आता संपूर्ण राज्याची जबाबदारी सोपवण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईत, राज्य परिषदेच्या अधिवेशनात श्री. चव्हाण यांच्याकडे पक्षाच्या प्रदेश अध्यक्षपदाची जबाबदारी मी सोपविली. या नव्या जबाबदारीबद्दल श्री. चव्हाण यांचे मन:पूर्वक अभिनंदन! त्यांची प्रदेश अध्यक्षपदाची कारकीर्द आजवरच्या राजकीय प्रवासाप्रमाणेच उज्ज्वल यशाची ठरेल, असा मला विश्वास आहे.

पक्षाने मला प्रदेश अध्यक्षपदावर काम करण्याची संधी दिली याबद्दल मी पक्ष नेतृत्वाचे आभार मानतो. ३ वर्षापूर्वी माझी या पदासाठी निवड झाली त्यावेळी ही जबाबदारी मी पेलू शकेन का, याविषयी मनात साशंकता होती. मात्र देवेंद्र फडणवीस यांच्यासह तळागाळातील सर्व कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांनी मला मोठी साथ दिली. या ३ वर्षात अनेकवेळा संपूर्ण राज्यभर हिंडून सामान्य कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. या ३ वर्षात फ्रेंड्स ऑफ बीजेपी अभियान, धन्यवाद मोदीजी अभियान, सेवा पंधरवडा अभियान, हर घर तिरंगा अभियान, मतदार चेतना अभियान, घर चलो अभियान, संपर्क से समर्थन अभियान, 'मेरी माटी मेरा देश' अभियान, नमो वॉरियर्स अभियान, रुग्ण मित्र अभियान, कॅन्सर मुक्त महाराष्ट्र अभियान, बुध्दिजीवी संमेलन, जनजाती महासंपर्क, चौपाल अभियान, ग्राम परिक्रमा अभियान, ओबीसी युवा संवाद, नमो ॲप, विकसित भारत अँबेसिडर अभियान, गांव चलो अभियान असे अनेक उपक्रम राबविताना पक्षाचे कार्यकर्ते किती मेहनत घेतात, याची कल्पना आली. पक्षासाठी सर्वस्व देणाऱ्या कार्यकर्त्यांचे आभार मानतो.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे


कार्यकर्त्यांना लाभणार रवी नामक 'दादा' ! ०४


भारतीय जनता पार्टी हीच माझी ओळख ०७


सामान्य कार्यकर्त्याला मोठं करणारा पक्ष! ०९


आणीबाणीच्या अत्याचारांची एक वेगळी बाजू ११


कलम 370 रद्द झाल्यानंतरची काश्मीरची विकास यात्रा १५


राष्ट्रनीतीचा पांथस्थ! १८


हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# कार्यकर्त्यांना लाभणार रवी नामक 'दादा' !

● शिवराय कुळकर्णी, प्रदेश प्रवक्ते

> श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडी यांनी एका बैठकीत प्रत्येक कार्यकर्त्याने 'दादा' बनावे असे सांगून त्यांनी दादा शब्दाची उकल केली होती. इंग्रजी भाषेत 'दादा' या शब्दाचे स्पेलिंग DADA असे होते. यातील पहिला D हा Destination चा. नंतरचा हा Attitude चा तर पुढचा D हा Direction चा. शेवटचा हा Administration चा, अशी ती उकल होती.

**एकदा** ध्येय, गंतव्य स्थान निश्चित करणे, त्यानुसार वर्तणूक असावी, अंगी ध्येयाचा संचार असावा. आपली ध्येयाप्रत वाटचाल सुरु आहे की नाही यासाठी सतत आपली दिशा तपासावी आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे ध्येयाला अनुकूल संघटना आणि प्रशासन तयार करावे. हे सारे जो करेल तो कार्यकर्ता खरा 'दादा'!

भाजपाच्या महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांचे भाग्य आहे की त्यांना संघटनेचे नेतृत्व करण्यासाठी असाच दादा आता लाभला आहे. रवीदादा ! राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भारतीय जनता पार्टी यांच्या विचारधारेचे संस्कार एका तरुण कार्यकर्त्याच्या मनावर बिंबले आणि त्यातूनच महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर हा 'रवी' नावाचा 'दादा' माणूस उदयाला आला! म्हणजेच भाजपाचे नवनिर्वाचित महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण. ते अध्यक्ष होणार याचे संकेत केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शाह यांनी दिले होतेच. मुंबई येथे झालेल्या राज्य परिषद अधिवेशनात त्यांच्या



अध्यक्षपदाची घोषणा झाली. नेता नावारूपाला आला की त्याला 'जी', 'साहेब' आपोआपच लावले जाते, पण या नेत्याच्या संपर्कात असलेल्या हजारो कुटुंबांनी त्यांना आपल्या आयुष्यात प्रेमपूर्वक 'दादा' हे स्थान दिले. सलग चारवेळा आमदार म्हणून विजयी झाल्यावर आणि राज्याच्या मंत्रीमंडळात कर्तृत्वाचा ठसा उमटवलेला असताना रवीदादांची पुन्हा मंत्री म्हणून वर्णी लागणे अशक्य नव्हते. मंत्रीपद सहजतेने त्यांच्या वाट्याला आले असते. पण सत्ता काळात संघटनेच्या इच्छेनुसार दिली ती जबाबदारी स्वीकारणे हे इतर संघटनांमध्ये सापडणे आजच्या काळात कठीण दिसते आहे. हे भाजपा आणि संघ विचार वर्तुळात सहजपणे घडते. लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस संघटनेच्या आवश्यकतेसाठी क्षणाचाही विलंब न लावता, आढेवेढे न घेता मुख्यमंत्र्याऐवजी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारतात, हे आदर्श उदाहरण महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात ताजे आहे. त्यांनी नुसते उपमुख्यमंत्रीपद स्वीकारले नाही तर ते सरकार सुरळीत चालावे यासाठी वेळप्रसंगी स्वतःला प्रकाशझोतात न येऊ देता आपली संपूर्ण क्षमता पणाला लावली. नंतरच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने त्यांच्या परिश्रमांवर, बहुआयामी नेतृत्व क्षमतेवर शिक्कामोर्तब तर केलेच पण देवेंद्रजी पुन्हा मुख्यमंत्री झालेच पाहिजे हा जनमताचा रेटा महायुतीला मिळालेल्या प्रचंड मताधिक्याच्या मागे होता, हे आपल्याला नाकारता येणार नाही. देवेंद्रजींच्या पाठोपाठ लक्षावधी



श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून प्रदेश अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारताना श्री. रवींद्र चव्हाण.

कार्यकर्त्यांसमोर रवीदादा चव्हाण यांनी देखील असाच आदर्श प्रस्थापित केला आहे. केवळ पक्षाची इच्छा म्हणून जबाबदारी स्वीकारायची नाही तर झोकून देऊन त्या जबाबदारीला न्याय देण्याची सिद्धता त्यांनी केली. महाराष्ट्रात देवेंद्रजी पुन्हा मुख्यमंत्री झाले आणि रवीदादांकडे पक्षाच्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारी आली. तेंव्हापासून क्षणाचीही उसंत न घेता त्यांनी राज्यभर दौरे केले. संघटन पर्वात कार्यकर्त्यांची अफाट शक्ती एकत्र केली आणि ऐतिहासिक सदस्य संख्या नोंदवण्याचा विक्रम त्यांनी केला. रवीदादा चव्हाण यांच्या व्यक्तिमत्त्वात काही बाबी आवर्जून जाणवतात. रवीदादा नुसते राजकारणी नाहीत. त्यांचा उपजत पिंड समाजसेवेचा आहे.

आपल्या डोक्यात दररोज २४ तास पक्षाचा विचार असला पाहिजे. आपली ओळख ही कायम भाजपाचा कार्यकर्ता हीच असली पाहिजे. याच भूमिकेत कायम असावे म्हणून रवीदादा कायम आपल्या शर्टवर 'कमळ' लावतात. त्यांच्या निकट संपर्कात आलेले कार्यकर्त्यांचे किंवा इतर नागरिकांचे कुटुंबीय खुल्या मनाने रवीदादांच्या या गुणांची भरभरून प्रशंसा करतात. यातूनच त्यांनी अनेक परिवारांशी आपले घप्प नाते जोडले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या टर्ममध्ये राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात त्यांची वर्णी लागली. तेव्हा रायगड आणि पालघर या जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी त्यांच्याकडे होती. पुढे २०१६ ते २०१९ दरम्यान महाराष्ट्र सरकारमधील बंदरे, माहिती व तंत्रज्ञान, वैद्यकीय शिक्षण तसेच अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण या ४ खात्यांच्या राज्यमंत्रीपदाची जबाबदारी त्यांच्याकडे होती. शिंदे-फडणवीस सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागासह अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण या खात्यांचा कारभार यशस्वीपणे सांभाळला. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कातकरी कुटुंबांच्या घराच्या जागेचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित होता. हा प्रश्न सोडवायला काही तांत्रिक अडचणी होत्या. त्यांच्या यातना ज्यावेळी रवीदादांच्या समोर आल्या तेव्हा त्यांनी तमा न बाळगता स्वतःच्या मालकीची जमीन त्या कातकरी कुटुंबियांना दान केली, हे उदाहरण त्यांच्या संवेदनशीलतेचा परिचय देण्यासाठी पुरेसे आहे.

श्रीरामजन्मभूमी मंदिर निर्माण असो, काश्मीरचा विषय असो की, हिंदुत्वाचा कुठलाही विषय असो, रवीदादा अग्रक्रमाने आघाडीवर असतात. वर्तमानात डोंबिवलीतील सांस्कृतिक वातावरण अधिक समृद्ध करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांना एकत्रित करून 'पार्टी नही परिवार है, संस्था नही संस्कार है !' या दिशेने हे चतुरस्त्र नेतृत्व भाजपाला अधिक लोकाभिमुख करेल या विश्वासासह **रवीदादांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.** ■

# युवा मोर्चा कार्यकर्ता ते प्रदेशाध्यक्ष

**भारतीय** जनता युवा मोर्चाचा सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणून राजकीय प्रवास सुरू केलेल्या रवींद्र चव्हाण यांची प्रदेश अध्यक्षपदापर्यंत वाटचाल भारतीय जनता पार्टीचे वेगळेपण दाखवणारी ठरली आहे. राजकारणाची कोणतीही पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबातून आलेल्या श्री. चव्हाण यांनी कर्तृत्व आणि परिश्रमाच्या जोरावर भारतीय जनता पार्टीसारख्या जगातील सर्वात मोठ्या राजकीय पक्षाचे अध्यक्षपद मिळवले आहे. सामान्य कार्यकर्त्याला अशा पद्धतीने न्याय देणारा भाजपा हा एकमेव पक्ष आहे.

गेल्या २५ वर्षांतील रवींद्र चव्हाण यांच्या प्रवासाचा हा मागोवा ● २००२ साली भाजपा युवा मोर्चा कल्याण जिल्हा उपाध्यक्षपदी निवड. ●२००५ साली कल्याण –डोंबिवली महानगरपालिकेच्या स्वातंत्र्यवीर सावरकर रोड प्रभागातून नगरसेवक म्हणून विजयी. ●२००७ साली कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदी निवड. ● २००९ साली नवनिर्मित डोंबिवली विधानसभा मतदारसंघाचे पहिले आमदार म्हणून दणदणीत विजय. ●२००९ नंतर २०१४, २०१९ आणि २०२४ असा डोंबिवलीच्या आमदारकीचा विजयी चौकार. ●२०१६ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या टर्ममध्ये राज्यमंत्री, रायगड, पालघर या जिल्ह्यांचे पालकमंत्री. ●२०१६ ते २०१९ दरम्यान राज्य सरकारमधील बंदरे, माहिती व तंत्रज्ञान, वैद्यकीय शिक्षण तसेच अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण या ४ खात्यांच्या राज्यमंत्रीपदाची जबाबदारी. ●२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत कोकणातील सर्वाधिक मताधिक्य मिळवणारे आमदार. ●२०२० साली भाजपा महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीसपदी नियुक्ती. ●२०२२ मध्ये शिंदे–फडणवीस सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री. सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) आणि अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण या २ खात्यांचा कारभार, सिंधुदुर्ग,पालघर या जिल्ह्यांचे पालकमंत्री. ●अन्न, नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण मंत्रीपदाच्या कारकिर्दीत 'आनंदाचा शिधा', 'रेशन आपल्या दारी' सारखे महत्त्वाचे उपक्रम राबवले. ●मुंबई–गोवा हायवेशी निगडीत केंद्र व राज्य शासनाचे विविध विभाग, स्थानिक लोकप्रतिनिधी, बाधित क्षेत्रातील संबंधित भूधारक, वित्तीय संस्था, कंत्राटदार यांच्याशी समन्वय साधून वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या या महामार्गाचे सर्वाधिक टप्पे विकसित करण्याचे मोठे कार्य केले. विशेष म्हणजे नॅशनल हायवे अथॉरिटीच्या अखत्यारीतील या हायवेचे काम पूर्णत्वास नेण्याकरिता जातीने लक्ष घातले. ●स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून जवळपास ९२ हजार कोटींची रस्ते आणि पूलांची कामे करण्याची किमया रवींद्र चव्हाण यांनी घडवली. या काळात २३ हजार ८८६ किमी लांबीचे रस्ते आणि १ हजार ०५४ पूलांचे बांधकाम पूर्ण झाले असून २९ हजार ०४१ किमी लांबीचे रस्ते आणि १ हजार ७९७ पूलांचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. ●रस्ते, पूल, रेल्वे, मेट्रो, विमानतळ यांसारख्या २२ पायाभूत सुविधांच्या उभारणी आणि देखभालीसाठी श्री. चव्हाण यांच्या संकल्पनेतून राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ (MSIDC) स्थापन करण्यात आले. ●काश्मीर सफरीवर जाणाऱ्या पर्यटकांच्या मोफत निवास सुविधेसाठी काश्मीरमध्ये महाराष्ट्र भवन उभारण्याचा निर्णय श्री. चव्हाण यांनी घेतला. या भवनासाठी जम्मू – काश्मीरमधील बडगाम जिल्ह्यात येथे जवळपास १० हजार ११७ चौरस मीटर जमीन खरेदी करण्यात आली, यासाठी ९ कोटी ३० लाख रुपयांची तरतूद. ■



# भारतीय जनता पार्टी हीच माझी ओळख



**‘भाजपा आगे बढो’, अशा घोषणा द्या**

**रवींद्र चव्हाण आगे बढो, अशा घोषणा कार्यकर्त्यांनी यापुढे देऊ नयेत. ‘भारतीय जनता पार्टी आगे बढो’, अशा घोषणा कार्यकर्त्यांनी द्याव्यात. आपला पक्ष महत्वाचा आहे, नेत्यापेक्षा पक्ष मोठा आहे म्हणून इथून पुढे ‘भाजपा आगे बढो’, अशाच घोषणा द्या, अशी माझी सर्वांना विनंती आहे.**

माझ्या सारख्या सामान्य कुटुंबातून आलेल्या छोट्या कार्यकर्त्याला भारतीय जनता पार्टीसारख्या मोठ्या पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी दिली जाते ही फार मोठी गोष्ट आहे. भारतीय जनता पार्टीमध्येच हे घडू शकते. ही जबाबदारी सोपविल्याबद्दल मी पक्षाचा आभारी आहे. भारतीय जनता पार्टी हीच माझी ओळख आहे. कारण मला पक्षानेच घडवले आहे, पक्षानेच मला मोठे केले आहे. मला घडविणाऱ्या पक्षाचा सन्मान जपण्यासाठी काहीही करण्याची आपली तयारी आहे.

मी काय होतो, हे व्यासपीठावर उपस्थित असलेल्या सर्व ज्येष्ठ नेतेमंडळींना ठाऊक आहे. त्यामुळेच एका सामान्य कार्यकर्त्याला भाजपासारख्या मोठ्या पक्षाचे प्रदेश अध्यक्षपद देणे हे माझ्यावर उपकार आहेत, असेच मी समजतो. या पुढील काळात भारतीय जनता पार्टीची राष्ट्रवादाची विचारधारा राज्याच्या कानाकोपऱ्यात न्यायची आहे. भाजपाची विचारधारा निर्मळ आणि प्रवाही आहे. देशासाठी अहोरात्र काम करूनही मोदी सरकारबद्दल अपप्रचार केला जातो. हा अपप्रचार खोडून काढण्यासाठी आपणा सर्वांना मोदी सरकारची तसेच राज्यातील महायुती सरकारची कामे जनतेपर्यंत न्यायची आहेत. आता २०२९ ची निवडणूक डोळ्यापुढे ठेवून आपल्याला तयारीला लागायचे आहे. रामभाऊ म्हाळगी यांच्या आदर्श कार्यकत्याच्या व्याख्येप्रमाणे आपल्याला पायाला भिंगरी लावून, डोक्यावर बर्फ ठेवून आणि तोंडात साखर ठेवून काम करायचे आहे. आगामी काळात राज्यात भारतीय जनता पार्टीला सशक्त बनविण्याचा संकल्प प्रत्येक कार्यकर्त्याने करायचा आहे, भारतीय जनता पार्टीची राष्ट्रवादाची विचारधारा तसेच मोदी सरकारचे लोकोपयोगी निर्णय राज्याच्या कानाकोपऱ्यात जाऊन सामान्य माणसापर्यंत नेऊन पोहचविण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांच्या साथीने पार पाडेन.

**(मुंबईत झालेल्या राज्य परिषद अधिवेशनात प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्याची घोषणा झाल्यानंतर श्री. रवींद्र चव्हाण यांनी केलेल्या भाषणाचा संपादित अंश.)**







राज्य परिषद अधिवेशनात केंद्रीय मंत्री व निवडणूक अधिकारी किरेन रिजीजू यांनी रवींद्र चव्हाण यांना प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्याचे प्रमाणपत्र दिले. यावेळी राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, राष्ट्रीय सरचिटणीस व राज्याचे प्रभारी खा. अरुण सिंग, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आदी मान्यवर उपस्थित होते.




# सामान्य कार्यकर्त्याला मोठं करणारा पक्ष!

● देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

भाजपा प्रदेशाध्यक्ष म्हणून रवींद्र चव्हाण यांची निवड ही पक्षसंघटनेच्या मूलभूत मूल्यांची पुनः प्रचीती होती. त्यांनी एक सामान्य कार्यकर्ता म्हणून कामाला सुरुवात केली, युवा मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदापासून, नगरसेवक, स्थायी समिती अध्यक्ष, चार वेळा आमदार, राज्याचे मंत्री, पक्षाचे सरचिटणीस आणि आता प्रदेशाध्यक्ष!

**ही** केवळ राजकीय कामगिरी नव्हे, तर एका कार्यकर्त्याच्या जिद्दीची, चिकाटीची आणि पक्षाने एका सामान्य कार्यकर्त्याला दिलेल्या संधींची साक्ष आहे. ही केवळ निवडणूक नव्हती, ही एका सामान्य कार्यकर्त्याच्या नेतृत्वात पोहोचण्याची प्रेरणादायी वाटचाल होती. भाजपात घराणेशाही नाही. इथे कोणाचंही नेतृत्व हे त्याच्या कर्तृत्वावर ठरतं. देशातील ९९ टक्के पक्षांमध्ये अध्यक्षांची खुर्ची घरातच फिरते. भाजपामध्ये कोणाचंही रक्ताचं नातं नसलं, तरी हिंदुत्वाचं आणि भारतीयत्वाचं बंध आपल्याला जोडतात. चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रदेशाध्यक्ष म्हणून जबाबदारी घेतल्यानंतर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरत पक्ष उभा केला. १.५ कोटी सदस्य जोडले. स्थानिक ते राष्ट्रीय स्तरावरील प्रत्येक निवडणुकीसाठी संघटन कार्य शिस्तबद्धपणे केलं. लोकसभा निवडणुकीत फेक नॅरेटिव्हने भाजपाला खिंडीत गाठायचा प्रयत्न झाला. मात्र, बावनकुळे यांच्या नेतृत्वात कार्यकर्त्यांनी थेट नॅरेटिव्हने उत्तर दिलं. विधानसभेत महायुतीने विक्रमी २३५ जागा जिंकल्या



आणि भाजपाने एकहाती १३७ जागा जिंकल्या.

भाजपाचे नेतृत्व मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्याकडे आहे, ते नेतृत्व केवळ देशापुरतं नाही, तर जागतिक आहे. त्यांच्या नेतृत्वात भारताने नवा आत्मविश्वास कमावला आहे. सरकारे येतील-जातील, पण देश टिकला पाहिजे या श्रद्धेय अटलजी यांच्या विचारांशी निष्ठावान राहून गेल्या ११ वर्षांत मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी देशात परिवर्तन घडवून दाखवलं. मुंबईच्या संदर्भातही भाजपाने फरक दाखवून दिला. ज्यांनी मुंबई महापालिकेवर वर्षानुवर्षे सत्ता गाजवली, त्यांनी ती सोन्याचं अंडं देणारी कोंबडी समजून लुबाडली. गिरगाव, दक्षिण मुंबईतून मराठी माणूस हद्दपार झाला. आज त्यावर बोलणाऱ्यांनी प्रथम स्वतःहून उत्तर द्यावं, कारण, त्रिभाषा धोरणाच्या अहवालावर स्वाक्षरी करणारेही तेच होते. त्यांनीच हिंदीसह मराठी आणि इंग्रजी अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला. आणि आता मराठीच्या नावाखाली विरोध करत आहेत. भाजपाचं धोरण स्पष्ट आहे, मराठी सक्तीची आहे, आणि हिंदीसह सर्व भारतीय भाषांचा अभिमान बाळगणं ही आपली संस्कृती आहे. विदर्भ, मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, कुठलाही भाग असो, आम्ही दुष्काळाच्या छायेतून या प्रदेशांना बाहेर काढण्यासाठी मैदानात उतरलो आहोत. २०१४ नंतर आम्ही जे बोललो, ते करुन दाखवलं आणि हे महाराष्ट्राच्या जनतेनं अनुभवलं. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी 'विकसित भारत'चं स्वप्न पाहिलं आहे आणि आपण 'विकसित महाराष्ट्र' घडवून दाखवणारच. त्यासाठी अविश्रांत मेहनत करत राहू. महाराष्ट्र देशात अव्वल क्रमांकावर आणल्याशिवाय थांबणार नाही, हा शब्द देतो. रवींद्र चव्हाण यांना प्रदेशाध्यक्ष म्हणून मन:पूर्वक शुभेच्छा देतो. ■

# मनापासून आभार

**प्रिय कार्यकर्ते बंधू आणि भगिनींनो, सस्नेह नमस्कार!**
**कविवर्य ना. धो. महानोरांच्या ओळी आहेत,**
**कोणती पुण्ये अशी येती फळाला**
**जोंधळ्याला चांदणे लगडून जावे !!**
**अशीच काहीशी भावनिक अवस्था माझी झाली आहे.**

**साधारण** ३५ वर्षांपूर्वी कसलीही राजकीय पार्श्वभूमी नसताना माझ्यासारख्याच सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी मी माझ्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली. भारतीय जनता पार्टीचा सामान्य कार्यकर्ता म्हणून पक्षाच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी भिंती रंगवणे, पत्रके वाटणे, गावोगाव कधी सायकलवर, कधी मोटरसायकलवर, तर पायीच प्रवास करणे इथपासून सुरू झालेला माझा प्रवास भारतीय जनता पार्टीच्या प्रदेशाध्यक्षपदापर्यंत येऊन पोहोचला; हे माझ्यासाठीच अविश्वसनीय आहे. खरोखरच मी कधी स्वप्नातही विचार केला नव्हता की, कधीतरी भारतीय जनता पार्टीचा राज्याचा अध्यक्ष म्हणून आपण काम करू. सामान्यामधल्या असामान्य शक्तींना जागृत करणे हीच तर आपल्या पक्षाची किमया आहे.

१२ ऑगस्ट २०२२ रोजी जेव्हा मी पक्षाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली तेव्हा आनंद तर होताच पण त्याहून अधिक जबाबदारीचे दडपण होते. अनेक पिढ्यांनी, अतिशय कष्टाने, रक्ताचे पाणी करून राज्यात हा पक्ष उभा केला, वाढवला आणि त्यातून माझ्यासारखे कित्येक कार्यकर्ते घडले. उत्तमरावजी पाटील, ना. स. फरांदे, गोपीनाथराव मुंडे, नितीनजी गडकरी, भाऊसाहेब फुंडकर, देवेंद्रजी फडणवीस, सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्यासारख्या अनेक मान्यवरांनी जे पद भूषविले, त्या पदाची जबाबदारी स्वीकारणे हे माझ्यासाठी शिवधनुष्य होते. ते शिवधनुष्य समर्थपणे पेलण्याचा मी माझ्या परीने व आपल्या साथीने प्रामाणिक प्रयत्न केला.

या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात मी महाराष्ट्रभर अनेकवेळा प्रवास केला. महाराष्ट्रातील प्रत्येक कानाकोपऱ्यात, चांद्यापासून बांद्यापर्यंत, तळागाळापर्यंत व्यक्तिशः पोहचण्याचा प्रयत्न केला. बूथवरचे सामान्य कार्यकर्ते ते राज्यातील नेते अशा सर्वांमध्ये योग्य समन्वय ठेऊन पक्षाचा विस्तार कसा होईल यासाठी प्रयत्न केले. आपण, महाराष्ट्रामध्ये संघटनपर्व यशस्वीपणे राबवत दीड कोटी सदस्यसंख्या असलेला भारतीय जनता पक्ष राज्यातील सर्वात जास्त सदस्यसंख्या असलेला पक्ष बनवला ही माझ्यासाठी अतिशय अभिमानास्पद बाब आहे.

या संपूर्ण प्रवासात पक्षाच्या सर्व नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी व सर्व कार्यकर्त्यांनी मला खंबीर साथ दिली, त्यामुळे मी हे शिवधनुष्य पेलू शकलो. या प्रवासात राज्यातील मायबाप जनतेने देखील राज्यातील प्रत्येक ठिकाणी अतिशय आपुलकीने स्वागत केले, प्रेम केले, साथ दिली. आपले हे प्रेम व साथ कायम राहील, याची मला खात्री आहे.

राष्ट्रप्रथम, मग पक्ष आणि मग स्वतः हे ब्रीद उराशी बाळगून मी भारतीय जनता पक्षाचा एक सामान्य कार्यकर्ता म्हणून मागील तीन दशकांपासून काम करतो आहे. मी विश्वास देतो की, आई जगदंबेच्या आशीर्वादाने माझ्या जीवात जीव असेपर्यंत याच प्रामाणिकतेने काम करत राहीन.

आपल्या सहकार्याबद्दल आपल्या सर्वांचे आभार! अध्यक्ष म्हणून काम करीत असताना अनवधानाने माझ्याकडून काही चुका झाल्या असतील, कुणाला रागावलो असेल तर मी आपणा सर्वांची मनापासून माफी मागतो.

आपला लोभ असाच कायम असावा, ही विनंती.

**आपला नम्र,**

**चंद्रशेखर बावनकुळे**

# आणीबाणीच्या अत्याचारांची एक वेगळी बाजू



● **माधव भांडारी**, प्रदेश उपाध्यक्ष (मुख्यालय)

> श्रीमती इंदिरा गांधीनी देशावर आणीबाणी लादून एकोणीस महिन्यांसाठी संपूर्ण देशालाच एखाद्या भीषण तुरुंगाची अवकळा आणली होती त्या घटनेला २५ जून रोजी पन्नास वर्षे पूर्ण झाली. स्वतंत्र भारताच्या इतिहासातले ते अत्यंत दुर्दैवी दिवस होते.

**भारतावर** केवळ आपली व आपल्या नंतर आपल्या खानदानाचीच सत्ता अबाधितपणे रहावी ह्या एकमेव उद्देशाने इंदिरा गांधींनी ते दुष्ट पाऊल टाकले होते. त्या एकोणीस महिन्यांच्या अत्याचारी कारभाराचे दुष्परिणाम साऱ्या भारताला भोगावे लागले होते. इंदिरा गांधींच्या राजकारणाला विरोध करणाऱ्या रा.स्व.संघासारख्या बिगर राजकीय संघटना, कम्युनिस्ट, महाराष्ट्रातील शिवसेना असे काही मोजके राजकीय पक्ष वगळून सर्व विरोधी पक्ष, अपक्ष वावरणारे विरोधक, आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी संघटना, कामगार संघटना अशा सगळ्यांवर दडपशाहीचा वरवंटा फिरवला गेला. राष्ट्रीय नेत्यांपासून अगदी लहानातल्या लहान कार्यकर्त्यापर्यंत लाखो लोकांना अकारण तुरुंगात डांबून ठेवले. अनेक संघटनांवर बंदी घातली. सेन्सॉरशिप लादून वृत्तपत्रांचे गळे आवळले. तेव्हा अन्य प्रसार माध्यमे, समाज माध्यमे नव्हतीच; नाहीतर त्यांचेही नरडे दाबले गेले असते. जनतेच्या विचार, आचार, प्रचार स्वातंत्र्यांसह सर्व स्वातंत्र्ये तर हिरावून घेतलीच पण अगदी जगण्याच्या हक्कासकट जनतेचे सर्व मूलभूत हक्क सुद्धा काढून घेतले होते.

देशाचे संविधान पूर्ण बाजूला सारून हा हुकुमशाहीचा जुलमी कारभार इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने

चालवला होता. ह्यापैकी अनेक राजकीय मुद्यांची चर्चा होत असते. पण ज्या क्षेत्रांचा व व्यक्तींचा राजकारणाशी काहीही संबंध नव्हता अशा क्षेत्रांवरही आणीबाणीने वरवंटा फिरवला. आणीबाणीच्या बुरख्याखाली सत्ताधाऱ्यांनी केलेल्या अत्याचारांमुळे त्या क्षेत्रातील अनेक व्यक्ती आयुष्यातून उठल्या, काहींनी जीव गमावले तर अनेकजण त्या क्षेत्रातून कायमचे बाहेर फेकले गेले.



**किशोरकुमारची गाणी आकाशवाणी, दूरदर्शनवर लावायची नाहीत, असा आदेश आणिबाणीत काढला गेला.**

आज आणीबाणीला पन्नास वर्ष पूर्ण होत असताना मी अशा काही क्षेत्रांची व त्यातील भरडल्या गेलेल्या व्यक्तींची आठवण करणार आहे. कारण राजकीय व्यक्तींवर, कार्यकर्त्यांवर केलेल्या अत्याचारांची चर्चा सतत होत असते. सेन्सॉरशिपमुळे वर्तमानपत्रांना झालेला त्रास नेहेमी चर्चेत असतो. पण आणीबाणी, सेन्सॉरशिप ह्या सगळ्यांच्या वरवंट्याखाली देशातील कला, संगीत, चित्रपट, नाट्य, साहित्य, काव्य ही सगळी क्षेत्रेसुद्धा कमालीची भरडली गेली, ह्या क्षेत्रातील अनेक व्यक्तींना कारण अकारण तुरुंगवास भोगावा लागला, काहींनी जीवघेण्या यातना सोसल्या तर काहींचे कल्पनातीत आर्थिक नुकसान झाले. आणीबाणीच्या काळ्या दिवसांबद्दल बोलताना अशा सगळ्यांची आठवण देखील आवर्जून केली पाहिजे. आणीबाणीने ह्या क्षेत्रांचा चेहरामोहरा बदलून टाकला. आणीबाणीमुळे झालेल्या अशा बदलांची सुद्धा चर्चा झाली पाहिजे.

आणीबाणीचा पहिला फटका विद्रोही साहित्य आणि नाट्यक्षेत्राला बसला. १९७० च्या दशकात मुंबई, दिल्ली व कलकत्ता अशा शहरांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने विद्रोही साहित्याची चळवळ उभी राहू लागली होती. त्याचे पडसाद नाट्य व चित्रपट यामध्ये पडू लागले होते. समांतर सिनेमा व नाटकांचे एक मोठे वातावरण तयार झाले होते. त्यातून काही उत्तम लेखक, कवी, कलाकार आणि कलाकृती लोकांसमोर येत होत्या. प्रस्थापिताच्या विरोधात जाणारी, बोलणारी ही चळवळ मोठ्या प्रमाणात डाव्या विचारांकडे झुकलेली होती हे खरे असले तरी डाव्यांच्या सल्ल्यानेच चालणाऱ्या प्रस्थापित सरकारला ती चळवळ परवडणारी नसल्यामुळे मान्य नव्हती. कोणत्याही पद्धतीने गरिबी, विषमता, भ्रष्टाचार, सरकारी जुलूम अशांचे चित्रण करणारे काहीही सरकारला मान्य नव्हते. त्यामुळे सेन्सॉरशिप फक्त बातमीदारीपुरतीच मर्यादित नव्हती. ती कथा, कविता, कादंबरी, नाटक, चित्रपट अशा सगळ्यांनाच लागू होती. चित्रकारांनी काढलेली चित्रे, पुस्तकांची मुखपृष्ठे एवढेच नाहीतर चित्रप्रदर्शने सुद्धा ह्या तडाख्यातून सुटली नव्हती. त्यामुळे ह्या सृजनशील विद्रोही, समांतर चळवळीचा गळाच घोटला गेला. त्यातून पुढे येऊ लागलेल्या अनेक लेखक, कवी, कलाकारांचा खऱ्या अर्थाने जन्मापूर्वीच मृत्यू झाला.

अशी सेन्सॉरशिप इंग्रजांनी सुद्धा ह्या देशातल्या जनतेवर लादली नव्हती. त्यांनी १९०७ साली प्रसिद्ध झालेल्या व रंगमंचावर खूप गाजलेल्या कीचकवध नाटकाच्या प्रयोगावर व छापील पुस्तकावर बंदी घातली, लो.टिळकांवर त्यांच्या लिखाणासाठी वारंवार खटले भरले, तुरुंगात टाकले, आगरकर, काळकर्ते परांजपे, काकासाहेब खाडिलकर अशा अनेकांच्या लिखाणावर कारवाई केली, देशभरातल्या काही वृत्तपत्रांवर बंदी घातली हे सगळे खरे असले तरी सरसकट मुस्कटदाबी इंग्रजांनी केली नव्हती.

हिटलर-स्टालिन-माओच्या पठडीतील ही दडपशाही इंदिरा गांधी व काँग्रेसने बिनदिक्कत केली. 'आंधी' सारख्या अत्यंत तरल, हिंदी चित्रपटात सहसा न आढळणाऱ्या काव्यमय प्रेमकथेला सुद्धा त्याचा विनाकारण दणका बसला. मूळ कथानक, व्यक्तिरेखा ह्यात अनेक बदल व काटछाट करायला लावल्यामुळे चित्रपटाचे काम लांबत गेले. त्यानंतर सुद्धा 'आंधी' प्रदर्शित करण्यासाठी खूप वेळ गेला. तरी तो प्रदर्शित झाला. मुळातच सुंदर कलाकृती असल्यामुळे गाजला. कमलेश्वर कथा, गुलजारची पटकथा व गीते, सुचित्रा सेन-संजीवकुमार यांचा अविस्मरणीय अभिनय, राहूल देव बर्मनचे अप्रतिम संगीत आणि लता मंगेशकर-किशोरकुमार यांनी गायलेली अजरामर गीते ह्या सगळ्या जमलेल्या रसायनामुळे तो चित्रपट तेव्हाही लोकप्रिय ठरला, आजही तो बघितला जातो. पण असा चित्रपट एखादाच असतो.

'किस्सा कुर्सी का' सारखे काही राजकीय व्यंगात्मक



गुलजार यांच्या आंधी या चित्रपटातील नायिका श्रीमती इंदिरा गांधी यांच्यासारखी दिसते या कारणावरून या चित्रपटावर आणिबाणीत बंदी घातली गेली.

चित्रपट तर प्रदर्शितच होऊ शकले नाहीत. आणीबाणी उठल्यानंतर त्यापैकी काही पडद्यावर आले पण तोपर्यंत त्यांची प्रासंगिकता व औचित्य संपले होते. अशा चित्रपटांशी संबंधित निर्मात्यांपासून कलाकारांपर्यंत सर्वांचेच त्या काळात प्रचंड नुकसान झाले. समांतर रंगभूमीवरील अर्थवाही प्रायोगिक नाटकांना तसेच समांतर सिनेमाला सुद्धा ह्या सेन्सॉरशिपचा मोठा फटका बसला. त्या अनुभवामुळे समांतर साहित्य-नाट्य-सिनेमा यांच्या गाड्याची दिशा व गती बदलली ती आजतगायत मूळपदावर आलेली नाही. हे नुकसान फार मोठे असून कधीही भरून न निघणारे आहे.

सेन्सॉरच्या बडग्याखाली जप्त केल्या गेलेल्या लेखनाची, साहित्याची गणती कोणीच ठेवली नाही. ज्यांनी आपल्या लेखनाची आणखी एखादी प्रत स्वत:कडे ठेवली होती अशांचे काही लेखन वाचले, पण वाचलेल्या लेखनापेक्षा नष्ट झालेल्या लेखनाचे प्रमाण फार मोठे होते. कारण त्या काळात दुसरी प्रत काढून ठेवून ती सांभाळणे हेही सहज परवडणारे नव्हते. माझ्या स्वत:च्या काही कथा, कविता व लेख असेच जप्त झाले ते गेलेच. नंतर तर मी कथालेखनच बंद केले. माझ्यासारखे कैक होते.

कै. बाळ ठाकूर ह्या महाराष्ट्रातील थोर चित्रकारांनी सा.विवेकसाठी काढलेली अनेक अप्रतिम रेखाचित्रे त्या दिवसात सेन्सॉरने जप्त केली ती नाहीशीच झाली. मुंबईतून प्रसिद्ध होणाऱ्या एका प्रतिष्ठित दैनिकाच्या दिवाळी अंकासाठी कै.कुसुमाग्रजांनी एक अतिशय अर्थवाही दीर्घ गद्यकाव्य लिहिले होते. तिच्या करिताही बाळ ठाकूर ह्यांनीच रेखाटन केले होते. ते गद्यकाव्यही तेव्हा प्रसिद्ध होऊ शकले नव्हते, आणीबाणी उठल्यानंतरच त्याला प्रसिद्धी मिळाली. कै.दुर्गा भागवतांचे तर नावसुद्धा छापणे अशक्य होते. असे कितीतरी प्रसंग नोंदवता येतील.

आणीबाणीचा हा तडाखा केवळ मराठी साहित्य कला किंवा प्रायोगिक क्षेत्राला बसला नव्हता. तो प्रस्थापितांनाही बसला होता हे आपण वर बघितलेच. मनोजकुमार, देव आनंद, विजय आनंद असे काही बडे अभिनेते जनसंघाशी जवळीक ठेवून होते, त्यांचा अनेक मार्गांनी छळ झाला. त्या काळात इंदिरा गांधींच्या आजूबाजूला वावरणारे काही काँग्रेसवाले इतके माजले होते की चित्रपटक्षेत्र हे आपल्या 'वैयक्तिक करमणुकीचे कुरण आहे' असा समज त्यांनी करून घेतला होता. अशा लोकांची मर्जी राखण्याच्या प्रयत्नांमध्ये 'शोले' पासून 'रजनीगंधा'पर्यंतचे अनेक चित्रपट प्रदर्शनासाठी रखडले होते. नावे घेणे योग्य नाही पण त्यात सर्वोच्च बड्या व्यक्तींचा समावेश होता. त्यांच्या 'आमंत्रणाला मान न देणाऱ्या' अनेक नवोदित अभिनेत्री पुन्हा कधीच पडद्यावर झळकू शकल्या नाहीत. लिहायचे ठरवले तर खूप काही लिहिण्यासारखे आहे. पण भारतीय सिनेसृष्टीतील दोन अत्यंत मोठ्या व्यक्तींना सोसाव्या लागलेल्या यातनांचा उल्लेख करून मी थांबणार आहे.

त्यापैकी पहिले नाव आहे कै.स्नेहलता रेड्डी. त्या एक



तुरुंगात झालेल्या अत्याचारामुळे स्नेहलता रेड्डी यांचा मृत्यू झाला.

उत्कृष्ट तेलगु व कन्नड अभिनेत्री होत्या. त्याचप्रमाणे त्या चळवळीशी जोडलेल्या होत्या. त्या काळातील झुंजार समाजवादी नेते जॉर्ज फर्नांडीस ह्यांच्याशी त्यांची विशेष जवळीक होती. त्यांच्या राजकीय विचारांमुळे स्नेहलता रेड्डी कानडी काँग्रेस नेत्यांच्या 'नजरेत खुपत' होत्याच. आणीबाणी ही संधी त्यांना मिळाली. जॉर्ज फर्नांडीसवर जो राजद्रोहाचा खटला भरला होता त्यात कर्नाटकातील काँग्रेस सरकारने स्नेहलता रेड्डींना आरोपी म्हणून गोवले व २ मे १९७६ रोजी त्यांना अटक केली. तुरुंगात त्यांच्यावर केलेल्या मानसिक व शारीरिक अत्याचारांचे वर्णन केवळ अमानुष, पाशवी ह्या शब्दातच करावे लागते. आठ महिने त्यांना एकांवासात ठेवले होते. त्या सर्व मानसिक व शारीरिक अत्याचारांमुळे स्नेहलता रेड्डी यांची तब्येत इतकी ढासळली की त्या कोमात गेल्या. एवढे झाल्यानंतर 'दया' म्हणून इंदिरा सरकारने त्यांना १५ जानेवारी १९७७ रोजी पॅरोलवर सोडले आणि सात दिवसांनी – २२ जानेवारीला त्यांचा मृत्यू झाला. ह्या निमित्ताने त्यांचे स्मरण करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करणे आपले सर्वांचे कर्तव्य आहे.

दुसरे नाव तर ह्याहून मोठे आहे. ते म्हणजे पार्श्वगायक, संगीतकार, अभिनेता, दिग्दर्शक व निर्माता म्हणून ठसा उमटवणारे महान अष्टपैलू कलाकार किशोरकुमार! पार्श्वगायक म्हणून आपल्या कारकीर्दीच्या शिखरावर असलेल्या किशोरकुमारनी आणीबाणीच्या प्रचारासाठी गाणी गावीत असा प्रस्ताव त्यांच्यासमोर ठेवून इंदिरा गांधींच्या एका अत्यंत निकटच्या मंत्र्याने त्यांना दिल्लीला बोलावले. किशोरकुमारनी तो प्रस्ताव नाकारला व दिल्लीला भेटायला जायलाही नकार दिला. खरेतर किशोरकुमार निखळ कलावंत होते. कोणत्याही राजकीय विचारांशी, संघटनांशी किंवा व्यक्तींशी त्यांची जवळीक नव्हती. पण, 'किशोरकुमार आमच्या आमंत्रणाला किंमत देत नाहीत, आम्ही केलेली सूचना आदेश आहे हे समजून घेत नाहीत' म्हणून दिल्लीश्वरांचे पित्त खवळले आणि एका रात्रीत आकाशवाणीवर वाजणारी त्यांची सर्व गीते बंद झाली. अर्थात त्यातून नियमित मिळणारे मानधन बंद झाले. हिंदी चित्रपट निर्मात्यांना 'योग्य सूचना' गेल्या – पार्श्वगायन रोडावले. एवढे करूनही समाधान न झाल्यामुळे किशोरकुमार यांच्या मागे आयकर खाते हात धुवून लागले. त्यांना काही दिवस तुरुंगही बघावा लागला. आपल्यासमोर मान न झुकवणाऱ्या व्यक्तीवर सूड उगवण्यासाठी सरकारी यंत्रणांचा गैरवापर करणे म्हणतात ते ह्या कृत्याला! आज जे काँग्रेसी व अन्य काही पक्षांचे नेते भाजपा सरकारवर अशा आशयाचे बिनबुडाचे आरोप करत आक्रोश करत फिरतात त्यांनी ह्या सर्व घटना आठवून मग बोलावे.

इंदिरा गांधींच्या काँग्रेस सरकारने किशोरकुमार ह्यांचे एवढे आर्थिक नुकसान केले की शेवटी त्यातून बाहेर पडण्यासाठी किशोरकुमारना जाहीर कार्यक्रम सुरु करावे लागले. कलाकार म्हणून महान असलेल्या किशोरकुमार यांचा हा दुसरा मोठेपणा अधिक महान होता. त्यांनी सरकारच्या अत्याचारासमोर मन झुकवली नाही. आपल्या मार्गाने त्यांनी एकट्याने लढा दिला पण आपली व कलाक्षेत्राची मान ताठ ठेवली. त्यावेळेला किशोरकुमार झुकले असते तर देशातील सर्व लहानथोर गायक गायिकांना आणीबाणीच्या प्रचाराची गाणी व इंदिराजींच्या आरत्या गात देशभर फिरावे लागले असते. आणि एकदा ह्या प्रकाराला सुरुवात झाल्यानंतर ते लोण दिल्लीपासून गल्लीपर्यंत कसे पसरत गेले असते ह्याची नुसती कल्पनासुद्धा करणे अवघड आहे. व्यक्तिगत नुकसान सोसून, आपल्या पद्धतीने कठोर एकाकी संघर्ष करून किशोरकुमार ह्यानी तो हिडीस प्रकार सुरु होण्यापूर्वीच थांबवला हे त्यांचे देशाच्या कलाक्षेत्रावर व कलाकारांवर अनंत उपकार आहेत. दुर्दैवाने त्यांच्या ह्या महान कार्याची काहीही नोंद आपण घेत नाही, आठवण देखील ठेवत नाही.

इंदिरा गांधींनी लादलेल्या आणीबाणीचे काळे दिवस, त्या काळात केंद्रातल्या व विविध राज्यातल्या काँग्रेस सरकारने केलेल्या राजकीय अत्याचारांची नोंद घेत असताना देशाच्या जीवनातील अन्य क्षेत्रावर झालेले दुष्परिणाम, तेथे केलेले अत्याचार, गैरकृत्ये ह्याच्याही नोंदी घेतल्या पाहिजेत, त्यांचीही अधिकाधीक चर्चा झाली पाहिजे, त्यासाठी हा एक प्रयत्न! ■

# कलम 370 रद्द झाल्यानंतरची काश्मीरची विकास यात्रा



जगातील सर्वाधिक उंचीचा पूल काश्मीरमध्ये चिनाब नदीवर बांधला गेला आहे.

● **शिवप्रकाश**, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री

> 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारताने आपली भूमिका अन्य देशांना कळावी, यासाठी सर्वपक्षीय खासदारांचे शिष्टमंडळ विविध देशांमध्ये पाठविली होती. खासदार संजय झा यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ इंडोनेशियात गेले होते. या शिष्टमंडळात काँग्रेस ज्येष्ठ नेते व माजी परराष्ट्र मंत्री सलमान खुर्शिद यांचा समावेश होता. श्री. खुर्शिद यांनी घटनेतील ३७० वे कलम रद्द करण्याच्या मोदी सरकारच्या निर्णयाची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे.

**श्री. खुर्शिद** म्हणतात की, ३७० वे कलम रद्द केल्याने काश्मीरमध्ये आर्थिक समृद्धी आली आहे. त्याचबरोबर काश्मीरमधील लोकशाही प्रक्रिया खर्या अर्थाने बळकट झाली आहे. ३७० वे कलम रद्द करण्याचा मोदी सरकारचा निर्णय धाडसी होता. या निर्णयामुळे देशाची एकता, अखंडता आणखी बळकट झाली.

काश्मीर ही महाॠषी कश्यप आणि माता सती यांची भूमी म्हणून ओळखली जाते. सम्राट अशोक आणि कुशान घराण्याचे राज्य असताना काश्मीरमध्ये बुद्ध धर्माचा मोठा प्रसार झाला होता. सम्राट ललितादित्य याचे राज्य असताना काश्मीरमध्ये संस्कृत भाषेचा प्रसार झाला होता. श्रीनगरजवळ असलेले शंकाचार्यांचे मंदीर हे जगद्गुरु शंकचार्यांच्या दिग्विजयाचे स्मरण करून देणारे आहे. कालांतराने मुस्लीम आक्रमकांच्या काळात झालेल्या धर्मांतरांमुळे काश्मीरमध्ये मुस्लिमांची लोकसंख्या वाढली. देश स्वतंत्र होत असताना अन्य संस्थानांप्रमाणेच काश्मीरचे राजे हरि सिंह यांनी भारतात विलिन होण्याच्या करारावर स्वाक्षरी केली होती. त्यावेळी शेख अब्दुल्ला यांच्या दबाबाखाली काश्मीरसाठी ३७० वे कलम लागू करण्याचा निर्णय त्यावेळचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी घेतला होता. नेहरू यांचा हा



अनेक वर्षे बंद असलेले शारदादेवी मंदिर आता खुले झाले आहे.

निर्णय देशाच्या दृष्टीने धोकादायक असल्याचे कालांतराने सिद्ध झाले. एका राज्याला वेगळा न्याय दिल्यामुळे देशाच्या एकात्मता आणि अखंडतेपुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले. काश्मीरसाठी ३७० व्या कलमाची निर्मिती करण्याच्या पंडित नेहरू यांच्या निर्णयाला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारख्या अनेक नेत्यांनी प्रखर विरोध केला होता. जनसंघाचे संस्थापक-अध्यक्ष डॉ.शामाप्रसाद मुखर्जी यांनी 'एक देश में दो निशान, दो विधान, दो प्रधान नही चलेंगे', अशी घोषणा देत ३७० व्या कलमा विरोधात देशव्यापी आंदोलन सुरू केले. या आंदोलनासाठी डॉ.मुखर्जी काश्मीरमध्ये गेले होते. त्यावेळी जम्मू-काश्मीरमध्ये प्रवेश करण्यासाठी परवाना लागत असे. हा परवाना न काढता काश्मीरमध्ये प्रवेश केल्याबद्दल डॉ.मुखर्जी आणि अनेक कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. अटकेत असताना डॉ.मुखर्जी यांचा २३ जून १९५३ रोजी गूढ मृत्यू झाला. तेव्हापासून भारतीय जनसंघ आणि त्यानंतर भारतीय जनता पार्टीने ३७० वे कलम रद्द केले जावे, ही मागणी सातत्याने लावून धरली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५ ऑगस्ट २०१९ रोजी ३७० वे कलम रद्द करत अनेक वर्षांची मागणी पूर्ण केली.

३७० वे कलम रद्द केल्यानंतर केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी काश्मीरमध्ये सुरू झाली. त्याचे चांगले परिणाम काश्मीरची जनता सध्या अनुभवते आहे. आता भारतातील कोणताही नागरीक काश्मीरमध्ये जमीन खरेदी करू शकतो. गेल्या ५ वर्षात सुमारे ५०० हून अधिक मालमत्ता खरेदीचे व्यवहार काश्मीरमध्ये झाले आहेत. रियल इस्टेट क्षेत्रात ३ हजार ५०० कोटी रूपयांची गुंतवणूक काश्मीरमध्ये होऊ घातली आहे. पूर्वी काश्मीरच्या तरुणींनी काश्मीर बाहेरील व्यक्तीशी विवाह केला तर त्या तरुणीला वडिलांच्या व वडिलोपार्जित मालमत्तेत वाटा मिळत नसे. ३७० वे कलम रद्द झाल्यामुळे काश्मीर बाहेरील व्यक्तीशी विवाह करणाऱ्या तरुणींनाही वडिलांच्या मालमत्तेत वाटा मिळू लागला आहे. मोदी सरकारने आपल्या कृतीतून महिला सक्षमीकरणाचे धोरण प्रत्याक्षात आणले. वाल्मिकी आणि अन्य अनुसूचित जाती-जमातीची दीड लाख कुटुंबे पाकिस्तान सोडून काश्मीरमध्ये आश्रयाला आली होती. या लोकांना भारतीय नागरिकत्व देण्याचा निर्णय मोदी सरकारने घेतला. मागील पाच वर्षांत ३५ लाखांहून अधिक लोकांना अधिवास दाखला (डोमिसाईल सर्टिफिकेट) मिळाला आहे. शिक्षण विषयक कायद्यात बदल केल्यामुळे १० लाखांपेक्षा अधिक मुलांना काश्मीरमध्ये मोफत शिक्षण मिळू लागले आहे. काश्मीरमधील अनुसूचित जाती-जमाती, वंचित घटकांना केंद्र सरकारच्या आरक्षणाचा लाभ मिळू लागला आहे. काश्मीरमधील आणखी काही जातींचा समावेश अनुसूचित जातींमध्ये करण्यात आल्यामुळे तसेच आरक्षणाची टक्केवारी वाढवल्यामुळे मागासवर्गीयांना त्याचे फायदे मोठ्या प्रमाणात मिळू लागले आहेत.

गेल्या काही वर्षात काश्मीरमध्ये ५६ हजार कोटींची गुंतवणूक झाली आहे. त्यामुळे ८० हजार पेक्षा अधिक लोकांना रोजगार मिळाला आहे. काश्मीरमध्ये १२०० पेक्षा अधिक स्टार्टअप सुरू झाले आहेत. या स्टार्टअप्समुळेही काश्मीरमधील रोजगाराच्या संख्येत वाढ झाली आहे. गेल्या ५ वर्षात काश्मीरमधील १० हजार किलोमीटरपेक्षा

अधिक लांबीच्या रस्त्यांची दुरुस्ती तसेच निर्मिती झाली आहे. झोजी ला आणि चेनानी नश्रीसारख्या बोगद्यांमुळे प्रवासाचे अंतर कमी झाले आहे. जम्मू ते श्रीनगर या चौपदरी महामार्गामुळे काश्मीरच्या विकासाचे नवे दालन उघडले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झालेला चिनाब नदीवरील पूल हा जगातील सर्वाधिक उंचीचा पूल ठरला आहे. ३५९ मीटरपेक्षा अधिक उंची असलेला हा पूल आयफेल टॉवरपेक्षाही उंच आहे. या पूलाच्या निर्मितीसाठी वापरले गेलेले तंत्रज्ञान जगभर कौतुकाचा विषय ठरले आहे. आयुष्मान भारत योजनेंतर्गत काश्मीरमधील १३ लाखांपेक्षा अधिक लोकांवर वैद्यकीय उपचार झाले आहेत. गेल्या ५ वर्षात अतिरेकी कारवायांना पायबंद बसल्यामुळे काश्मीरमध्ये येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत विक्रमी वाढ झाली आहे. ३७० कलम हटवल्यानंतर काश्मीरमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती झाली. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ६५ टक्क्यांहून अधिक मतदान झाले. जगद्गुरु शंकराचार्यांनी उभारलेल्या शारदादेवीच्या मंदिरात गेल्या ७० वर्षात कोणतेच धार्मिक कार्यक्रम झाले नव्हते. आता ३७० वे कलम रद्द झाल्यानंतर दिवाळी आणि सरस्वती पूजा यासारखे कार्यक्रम शारदादेवी मंदिरात प्रचंड उत्साहात पार पडले आहेत. २३ मार्च २०२३ रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते हे मंदीर पुन्हा उघडण्यात आले.




श्रीनगरच्या लाल चौकात गेल्या वर्षी श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा प्रचंड उत्साहात पार पडला.




ज्या लाल चौकात एकेकाळी तिरंगा फडकवण्याची हिंमत होत नव्हती तेथे आता तिरंगा दिमाखाने फडकतो आहे.

१९८० आणि १९९० च्या दशकात अतिरेक्यांच्या भयामुळे श्रीनगरमधील लाल चौकात देशाचा राष्ट्रध्वज फडकवता येत नव्हता. १९९१-१९९२ मध्ये भाजपाचे तत्कालीन राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.मुरली मनाहेर जोशी यांच्या नेतृत्वाखाली लाल चौकात तिरंगा फडकवण्यासाठी 'भारत एकता यात्रा' काढण्यात आली होती. कन्याकुमारीहून निघालेल्या या यात्रेचा समारोप २६ जानेवारी १९९२ रोजी श्रीनगरमधील लाल चौकात मोठ्या पोलीस बंदोबस्तात तिरंगा फडकवून झाला. या संपूर्ण यात्रेत विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ही सहभागी झाले होते. आता लाल चौकात तिरंगा मोठ्या अभिमानाने फडकविला जात आले. काश्मीर नागरीक आपल्या घरावरही तिरंगा लावत आहे. याच लाल चौकात गेल्या वर्षी श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा प्रचंड उत्साहात पार पडला. काश्मीरमधील अतिरेक्यांनी निर्माण केलेले भयाचे वातावरण आता संपले आहे, हेच या घटनातून दिसून आले आहे.

जम्मू-काश्मीरचा वेगाने विकास होत असल्याचे पाहून पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकांनीही भारतात सामील होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. काश्मीरची ही विकास यात्रा थांबविण्याच्या उद्देशानेच पहलगाम हत्याकांड घडविले गेले. या हत्याकांडाविरोधात संपूर्ण देश एकजुटीने उभा राहिला. काश्मीरची ही विकास यात्रा यापुढे अखंड चालू राहणार आहे. ■

# राष्ट्रनीतीचा पांथस्थ!

● **दिनेश गुणे**, ज्येष्ठ पत्रकार

> प्रदीर्घ काळ परकीय राजसत्तेच्या अमलाखाली राहिलेल्या भारतीय समाजाच्या मानसिकतेमध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात तीन विचारधारा विकसित झाल्या. ब्रिटिशांच्या सत्तेमुळे भारतीय जनतेस विकासाची, विद्येची वेगळी दृष्टी प्राप्त झाली असे मानणाऱ्या एका वर्गास ब्रिटीश राजवट ही गुलामगिरी असली तरी विकासाची संधी वाटत होती.

**ब्रिटीश** विचारधारा, त्यांची शिक्षणपद्धती आणि राज्यकारभाराची रीत भारतासारख्या परंपरावादात गुरफटून नव्याच्या शोधापासून अलिप्त राहिलेल्या देशाकरिता अनुकरणीय आहे, असे मानणारा हा वर्ग होता. त्याच दरम्यान, भारताची संस्कृती, परंपरा आणि अस्मितेची पुनर्स्थापना केल्याखेरीज समाजाचा विकास होणार नाही असे आग्रही प्रतिपादन करणारा दुसरा वर्गही होता. हा वर्ग विदेशी, विशेषतः युरोपीय जीवनशैलीचा कठोर टीकाकार आणि भारतीय संस्कृतीचा कट्टर पुरस्कर्ता होता. या वर्गाने संस्कृतीरक्षणाचा वसा घेऊन स्वातंत्र्याकडे वाटचाल करण्याचे ध्येय जपले, तर तिसरा एक वर्ग जहाल क्रांतिकारी विचारसरणीतून व आंदोलनात्मक मार्गांनी स्वातंत्र्याचे लढे लढत होता. सहाजिकच, याच काळात अशा तीन वर्गांची राजकीय बैठक तयार होत गेली. डाव्या विचारधारेच्या अनुयायांनी साम्यवादी पक्षांची कास धरली, मध्यममार्गी विचारसरणीचे लोक काँग्रेससोबत राहिले, तर उजव्या, किंवा हिदुत्ववादी विचारांचे पाईक असलेल्यांनी हिंदू महासभेस जवळ केले.

स्वातंत्र्यापासून आजपर्यंतच्या सुमारे पाऊणशे वर्षांच्या वाटचालीचे राजकीय दृष्टिकोनातून निरीक्षण केले तर असे



काश्मीर येथील सत्याग्रहात सहभागी होण्यासाठी हावडा रेल्वे स्थानकातून प्रयाण करताना डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी.

आढळते की सत्ता आणि प्रतिनिधित्वाच्या स्तरावर या तीन वर्गांमध्ये कमीअधिक अंतर दिसत असले तरी देशाच्या संपूर्ण राजनीतीमध्ये मात्र या विचारांचेच अस्तित्व दखल घेण्याएवढे अधोरेखित होऊन राहिलेले आहे. डाव्या विचारसरणीच्या नेत्यांनी देशातील श्रमिक, मजूर, शेतकरी आणि वंचित समाजास आपल्यासोबत जोडण्याचे प्रयत्न केले, मात्र, देशातील परंपरावर अंधश्रद्धांचा शिक्का मारून त्या नष्ट करण्याच्या प्रयत्नांत डावे पक्ष फारसे यशस्वी ठरले नाहीत. कम्युनिस्ट पार्टीच्या झेंड्याखाली एकत्र आलेले अनेकजण स्वातंत्र्यानंतर वैचारिक मतभेदांमुळे वेगळ्या चुली मांडून बसले. ब्रिटीश राजसत्तेशी संघर्ष करण्यासाठीच १८८५ मध्ये स्थापन झालेल्या काँग्रेसवर पहिल्या दोन दशकांत मध्यममार्गी व समन्वयवादी विचारांचे वर्चस्व होते. पुढे स्वदेशी आंदोलनाच्या रूपाने काँग्रेसला लढ्याचे एक प्रभावी अस्त्र हाती आले, आणि गांधीजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसनेही समाजातील मध्यमवर्गीय, वंचित गटांमध्ये आपले स्थान रुजविले. या देशाच्या परंपरांना धर्माचे अधिष्ठान आहे, देशाच्या समाजावर हिंदू धर्म आणि संस्कृतीचा पगडा आहे, त्यामुळे धार्मिक परंपरा आणि संस्कृतीला अव्हेरून व परंपरा पुसून कोणताच राजकीय पक्ष देश चालवू शकणार नाही, त्यामुळे हिंदुत्वाचे रक्षण करणे व परंपरांचा अभिमान जागृत ठेवणे ही गरज असल्याचे मानणाऱ्या हिंदुत्ववादी विचारसरणीस पोषक असे वातावरण तयार करण्याचे प्रयत्न स्वातंत्र्यपूर्व काळातही सुरू होते. त्यातच, राजकीय लांगूलचालनाच्या

प्रयत्नांमुळे देशात मुस्लिम लीगचा प्रभाव वाढू लागला होता. १९२५ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेमुळे हिंदुत्वाचा आणि हिंदू समाजसंघटनाचा विचार देशभर पसरू लागला. या विचारास होणारा राजकीय विरोध आणि त्यातून निर्माण होणारे संघर्षाचे प्रसंग टाळण्याकरिता, राजकीय मंचावर राजकारणाच्या माध्यमातूनच विरोधाची धार कमी करणे शक्य होईल या जाणिवेतून राजकीय पक्षाची स्थापना करण्याचा निर्णय संघ धुरिणांनी घेतला, आणि २१ ऑक्टोबर १९५१ या दिवशी दिल्लीतील एका प्रतिनिधी संमेलनात भारतीय जनसंघाची स्थापना करण्याचे जाहीर झाले. राजकीय मंचावर हिंदू राष्ट्रवादाचा, म्हणजे उजव्या विचारसरणीचा उदय झाला, आणि डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जनसंघाचे संस्थापक अध्यक्ष झाले. राष्ट्रवादी हिंदुत्वाच्या विचारास राजकीय दिशा देण्याची जबाबदारी संघाने जनसंघावर सोपविली, आणि हिंदुत्व रक्षणाचा झेंडा खांद्यावर घेऊन संघर्ष करणाऱ्या डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी जबाबदारीचे ते आव्हान स्वीकारले. जनसंघाच्या रूपाने राजकीय मंचावर हिंदुत्ववादी राष्ट्रनीतीचा विचार ठळक झाला.

स्वातंत्र्यानंतर देशात झालेल्या पहिल्याच निवडणुकीत उजव्या, हिंदुत्ववादी पक्षांच्या पदरी निराशादायक निकाल पडले. स्वातंत्र्यलढ्यातील संघर्षातून प्राप्त झालेल्या जनाधाराचा मोठा फायदा काँग्रेसला झाला. त्या निवडणुकीत काँग्रेसला ३६३ जागांवर विजय मिळाला, तर जनसंघ जेमतेम तीन जागा मिळवू शकला. राजकीय लढाई मोठी आहे, जनाधार मिळविण्यासाठी महत्प्रयास करावे लागणार आहेत, याची जाणीव डॉ. मुखर्जींसह सर्वच नेत्यांना होती. मात्र, हिंदुत्वाच्या विचारानेच पक्षाला राजकीय बैठक द्यायची हा निर्धार पक्का होता. १९५३ मध्ये काश्मीर आंदोलनात डॉ. मुखर्जींच्या संशयास्पद मृत्यूमुळे जनसंघास मोठा धक्का बसला, पण डॉ. मुखर्जी यांनी जनसंघास दिलेल्या भारतीय राष्ट्रवाद आणि हिंदुत्वाचे पुनरुत्थान या दोन विचारधारा मात्र पुढे भारतीय राजकारणात परिवर्तन घडवून आणण्याइतक्या सक्षम बनल्या. याच विचारांचा वारसा घेऊन पुढे पं. दीनदयाळ उपाध्याय, बलराज मधोक, पं. मौलिचंद्र शर्मा आदी नेत्यांनी जनसंघाची राजकीय विचारधारा जनमानसात रुजविण्यासाठी परिश्रम घेतले, आणि स्वातंत्र्यानंतर सुमारे तीन दशके देशावर असलेली काँग्रेसची पकड हळुहळू सैलावत गेली. आणीबाणीच्या काळात स्थापन झालेल्या जनता पार्टीच्या प्रयोगाने प्रस्थापित काँग्रेसला जोरदार झटका मिळाला. पुढे वैचारिक मतभेदातून जनता पार्टीमधून जनसंघास बाहेर पडावे लागले, आणि ६ एप्रिल १९८० या दिवशी संघ परिवारात भारतीय जनता पार्टी या नव्या नावाने जनसंघाचा नवा अवतार दाखल झाला. १९२५ ते १९५२ आणि १९५२ ते १९८० या तीन टप्प्यांत हिंदुत्व आणि राष्ट्रवादाचा विचार घेत धीराने वाटचाल करणारा भाजप आज सत्तेपर्यंत पोहोचला आहे, हा डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या त्यागाचा, द्रष्ट्या विचारांचा विजय म्हणावा लागेल. श्यामाप्रसादजींचे व्यक्तिमत्व, त्यांचे चिंतन, आणि 'हिंदुत्व हेच भारतीयत्व' हा त्यांचा विचार म्हणजे प्रखर हिंदुत्ववादाचे प्रतिबिंब आहे. जम्मू-काश्मीरच्या अलगतावादास खतपाणी घालणारे ३७० वे कलम रद्द करण्यासाठी प्राणांची आहुती देण्यास आपण तयार आहोत, असे तडाखेबंद भाषण २६ जून १९५२ रोजी त्यांनी संसदेत केले, आणि त्याच वर्षी ऑगस्टमध्ये जम्मू येथे झालेल्या विशाल मेळाव्यातही त्याच विचारांचा पुनरुच्चार केला. आपला हा संकल्प पूर्ण करण्यासाठी ८ मे १९५३ रोजी त्यांनी जम्मू काश्मीरकडे प्रयाण केले,आणि त्यांना अटक झाली. तुरुंगात असतानाच २३ जून १९५३ रोजी त्यांचा रहस्यमय मृत्यू झाला.

जातपात, धर्म, प्रांतभेदाच्या पलीकडे सर्वांकरिता जनसंघाची दारे खुली आहेत, असे डॉ. मुखर्जी यांनी आपल्या पहिल्या अध्यक्षीय भाषणात स्पष्ट केले होते. भारताची संस्कृती आणि मूल्यांच्या प्रतिष्ठेतच भारताचे भविष्य सामावलेले आहे. जसे आपण धर्म, किंवा कायद्याचा आदर करतो, तसाच आदर भारतीय संस्कृतीचा केला पाहिजे, आणि बंधुत्वाचा संदेश देणाऱ्या भारतीय मूल्यांचे पालन केले पाहिजे, असे ते या भाषणात म्हणाले होते. जात, धर्म, विचार आदी भेदभावांपासून राजकारणाने अलिप्त राहिले पाहिजे, असा विशाल विचार मांडून देशाच्या राजकारणाला नवी दिशा देणाऱ्या श्यामाप्रसादजींच्या स्वप्नातील भारतात हिंदू राष्ट्रवादाचा त्यांचा विचार पुढे नेत सर्वसमावेशक राजकारण करणाऱ्या विचारांनी आज अग्रस्थान मिळविले आहे, ही त्यांच्या तपश्चर्येचीच पुण्याई आहे. त्यामुळे, भारतीय राजकारणातील तेजस्वी सूर्य म्हणून डॉ. मुखर्जी यांच्या स्मृती कायमच तजेलदार राहतील. ■

# हिंदी सक्तीचा अपप्रचार अनाठायी!

● **नवनाथ बन**, प्रदेश माध्यम विभागप्रमुख

> तिसरी भाषा शिकवण्याच्या निर्णयामुळे मराठीचे स्थान कुठेही डळमळीत झालेले नाही. महाराष्ट्राची परंपरा ही समावेशक भाषिक संस्कृतीची आहे. शाळांमध्ये अनेक भाषा शिकवल्या गेल्या, तर विद्यार्थ्यांमध्ये संवाद साधण्याची क्षमता वाढून सामाजिक सौहार्दाला हातभारच लागेल.

**महाराष्ट्र** सरकारने इयत्ता पहिलीपासून नव्या शैक्षणिक धोरणानुसार त्रिभाषा सूत्र लागू करण्याचा निर्णय घेतला आणि लगेच काही ठरावीक राजकीय नेत्यांनी आरोपांच्या फैरी झाडण्यास सुरुवात केली. 'हिंदी सक्ती झाली' अशी आवई उठवली गेली. सर्वांत आधी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या निर्णयाला आक्षेप घेतला. काँग्रेस नेत्यांनीही त्यात भर घालत राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रत्यक्षात काय निर्णय घेण्यात आला आहे, हे नीट समजून घेतल्यास लक्षात येते की, हा अपप्रचार निव्वळ राजकीय हेतूने केला जात आहे.

या नव्या धोरणात सर्वप्रथम एक गोष्ट स्पष्ट आहे ती म्हणजे राज्य सरकारने हिंदी कुठेही अनिवार्य किंवा सक्तीची केलेली नाही. मराठी ही पहिली भाषा म्हणून सर्व शाळांमध्ये सक्तीची आहे. दुसरी भाषा म्हणून महाराष्ट्रात इंग्रजी शिकवली जाते, कारण ती जागतिक व्यवहाराची गरज आहे आणि तिसरी भाषा पूर्णपणे विद्यार्थ्याच्या पसंतीनुसार निवडण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. या पर्यायी भाषांमध्ये हिंदीबरोबरच संस्कृत, उर्दू, गुजराती, बंगाली, पंजाबी, कन्नड, तेलगू, तमिळ, मल्याळम, सिंधी, पाली, अर्धमागधी आणि महाराष्ट्रीय प्राकृत अशा अनेक भारतीय भाषांचा समावेश आहे.




राज ठाकरे किंवा काँग्रेसचे काही नेते या वास्तवाकडे पूर्णतः दुर्लक्ष करत 'हिंदीची सक्ती' केली जात आहे, हिंदी भाषा लादली जात आहे, असा भास निर्माण करत आहेत. पण तिसरी भाषा कुठलीही असू शकते. ती विद्यार्थ्याच्या आवडीनुसार ठरणार आहे. इतकेच नाहीतर एखाद्या शाळेत एखाद्या भाषेसाठी वीसहून अधिक विद्यार्थी असल्यास, शिक्षक नियुक्त केला जाणार आहे. जर विद्यार्थ्यांची संख्या कमी असेल, तर ऑनलाइन शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. त्यामुळे एकच विद्यार्थी संस्कृत किंवा पाली शिकू इच्छित असेल, तर त्याला त्याची संधी मिळते पण ऑनलाइन माध्यमातून आणि जर २० विद्यार्थी संस्कृत शिकू इच्छित असतील, तर त्या शाळेत संस्कृतचा शिक्षक नेमला जाईल. ही रचना हिंदीसाठीच नाहीतर सर्व भाषांसाठी सारखी आहे. म्हणून 'हिंदी सक्ती'चा आरोप पूर्णपणे खोटा आहे. आणि तो जाणूनबुजून जनतेत संभ्रम निर्माण करण्यासाठी केला जात आहे.

या निर्णयाचे राष्ट्रीय धोरणाशी सुसंगत स्वरूप पाहिले, तर हे त्रिभाषा सूत्र देशभरातील बहुतेक राज्यांनी स्वीकारले आहे. गुजरातमध्ये ९७ टक्के शाळांमध्ये, पंजाबमध्ये ९६ टक्के, कर्नाटकमध्ये ७६ टक्के आणि केरळमध्ये ७१ टक्के शाळांमध्ये त्रिभाषा धोरण लागू आहे. हे आकडे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणी संदर्भात तयार करण्यात आलेल्या अहवालांमधून समोर आले आहेत.

(संदर्भ– 'गुजरात, पंजाब लीड विथ थ्री लँग्वेजेस टॉट इन ९५ परसेंट स्कूल्स' हे 'द इंडियन एक्स्प्रेस'मध्ये २२ मार्च २०२५ रोजी प्रसिद्ध झालेले वृत्त.) या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रही आता त्याच दिशेने वाटचाल करत आहे. त्रिभाषा सूत्र हे शिक्षणात फक्त भाषिक समावेश वाढवण्यासाठी नाही, तर विद्यार्थ्यांच्या बहुभाषिक क्षमतेचा विकास करण्यासाठी तयार करण्यात आलेले धोरण आहे. विद्यार्थ्यांना एका राज्यापुरत्या भाषिक चौकटीत न अडकवता, विविध भाषांचा परिचय करून देणे हे या धोरणामागील महत्त्वाचे तत्त्व आहे.

याबाबत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेतला पाहिजे तो म्हणजे, 'फक्त राज्य मंडळातच तिसरी भाषा लादली जाते' असे नाही. तर महाराष्ट्रातील सीबीएसई आणि आयबी या शैक्षणिक मंडळांमध्ये पहिल्या वर्गापासून तीन भाषा शिकवल्या जातात. आयबी बोर्डाच्या शाळांमध्ये प्राथमिक वर्ष अभ्यासक्रमातही इंग्रजी, मराठी आणि एक पर्यायी भाषा शिकवण्याची पद्धत आहे. तर सीबीएसई शाळांमध्ये मराठी ही मातृभाषा म्हणून शिकवली जाते, त्यासोबत इंग्रजी आणि हिंदी शिकवली जाते. त्यामुळे त्रिभाषा धोरण हे केवळ राज्य शासनाचे नव्हे, तर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वीकारलेले धोरण आहे. मग राज्य सरकार हा निर्णय घेत असेल तर त्याविरोधात अकांडतांडव कशासाठी?

खरे तर, त्रिभाषा धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या यंत्रणा महाराष्ट्रात उभारण्यात येत आहेत. शिक्षकांची नेमणूक, ऑनलाइन शिक्षणाच्या सुविधा आणि भाषा निवडीच्या प्रक्रियेला पारदर्शक रूप देण्याकडे सरकार सातत्याने लक्ष पुरवत आहे. त्यामुळे शाळांमध्ये कोणती भाषा शिकवावी हे ठरविण्याचे पालक आणि विद्यार्थ्यांना पूर्ण स्वातंत्र्य आहे. त्यांच्यावर कुठेही हिंदी लादली जाणार नाही. तिसरी भाषा शिकवण्याच्या निर्णयामुळे मराठीचे स्थान कुठेही कमी झालेले नाही. उलट ते अधिक बळकट झाले आहे. मराठी ही पहिली भाषा म्हणून शाळांमध्ये अनिवार्य आहे. तसेच, केंद्र सरकारनेही मराठीसारख्या मातृभाषेतून व्यावसायिक शिक्षण देण्यासाठी पावले टाकली आहेत. उदाहरणार्थ, अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय या व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण मराठीतूनही देण्यात येणार आहे. वर्षानुवर्षे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची फक्त मागणी केली जात होती. पण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नांतून केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात दर्जा दिला. ही मान्यता मिळाल्यानंतर मराठीला शैक्षणिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक पातळीवर नवीन संधी प्राप्त झाल्या आहेत.

नरेंद्र मोदी सरकारने मराठीसाठी ऐतिहासिक निर्णय घेतले, व्यावसायिक शिक्षण मातृभाषेत उपलब्ध करून दिले, अभिजात दर्जा मिळवून दिला. काँग्रेसने आपल्या काळात अशा कोणत्याही गोष्टींसाठी प्रयत्न केला नाही, हेही विसरता येणार नाही. उलट, काँग्रेसच्या कारभारात मराठीच्या अनेक प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्यात आले. मराठीच्या प्रश्नावर ठोस धोरणात्मक उपाययोजना करण्याऐवजी केवळ आश्वासने देण्यात आली. मनसेचा मराठी भाषेसाठीचा आग्रह योग्यच आहे. पण त्याबदल्यात इतर भाषांचा द्वेष करणे किंवा त्या भाषा शिकण्यास विरोध करणे योग्य नाही.

महाराष्ट्रासारख्या सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आणि भाषिकदृष्ट्या संवेदनशील राज्यात भाषिक अस्मिता हा विषय कायमच राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू राहिलेला आहे. अनेकदा, निवडणुका जवळ आल्या की काही राजकीय पक्ष भाषेच्या मुद्द्यावरून जनतेत भावनिक उद्रेक घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. 'मराठीवर अन्य भाषांची सक्ती होत आहे', 'हिंदी लादली जात आहे' अशा घोषणा देऊन समाजात भीती निर्माण केली जाते. मात्र, या भावनांना अनेकदा तथ्यांचा आधार नसतो, त्या केवळ राजकीय फायद्यासाठी व्यक्त केल्या जातात. याच्या उलट, शैक्षणिक धोरणांचा उद्देश हा केवळ भाषेचा सन्मान राखणेच नाही, तर भाषिक सौहार्द वाढविणे आणि संवादक्षम पिढी निर्माण करणे हाच असतो. त्रिभाषा धोरण हे त्याच दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे.

जेव्हा एखाद्या विद्यार्थ्याला लहानपणापासून मराठीबरोबरच इतर भारतीय भाषा शिकण्याची संधी मिळते, तेव्हा त्याचे मन अधिक व्यापक होते. तो फक्त एका भाषेच्या प्रेमात गुरफटून राहत नाही, तर इतर भाषांबद्दलही जिज्ञासा, आदर आणि आपुलकी बाळगतो. भाषा हे केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृतीची वाहक असते. त्यामुळे विविध भाषा शिकणारा विद्यार्थी केवळ बहुभाषिकच नाही, तर बहुसांस्कृतिकतेचा स्वीकार करणारा नागरिक होतो. शाळांमध्ये अनेक भाषा शिकवल्या गेल्या, तर विद्यार्थ्यांमध्ये समजूतदारपणा, सहिष्णुता

आणि संवादक्षमतेचे बळ वाढते. हे विद्यार्थी भविष्यात केवळ चांगले नोकरदार किंवा व्यावसायिक नाही, तर समजूतदार, विवेकी आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार नागरिक म्हणून विकसित होतात. हेही लक्षात घ्यायला हवे की महाराष्ट्राची स्वत:ची परंपरा ही समावेशक भाषिक संस्कृतीची आहे. संत ज्ञानेश्वरांनी संस्कृत भाषेतील गीता सामान्य जनांसाठी मराठीत आणली. संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास या सर्व संतांनी मराठीच्या बळकटीकरणासाठी काम केले, पण त्यांनी कधीच इतर भाषांचा तिरस्कार केला नाही. संत नामदेवांचे मूळ कार्य मराठीत असले तरी, त्यांच्या शिकवणीचा प्रसार इतका व्यापक होता की त्यांच्या अनुयायांनी त्यांच्या अभंगांचे पंजाबी रूपांतर केले आणि काही पदे त्यांनी स्वत:ही पंजाबी भाषेत रचल्याचे मानले जाते. ही समन्वयी परंपरा पुढे नेण्याची जबाबदारी आपल्या शिक्षण व्यवस्थेवर आहे. त्यामुळे त्रिभाषा धोरण हे भाषिक सौहार्दाचे शिक्षण शालेय वयातच देते. हे धोरण केवळ शैक्षणिक नाही तर सामाजिक सलोख्याचेही पायाभूत साधन आहे. या धोरणाचे स्वागत झाले पाहिजे. केवळ मराठीसाठी नाहीतर भारतातल्या प्रत्येक भाषेच्या सन्मानासाठी आणि एका समरस समाजाच्या निर्मितीसाठी हे गरजेचे आहे. त्यामुळे टीका करणाऱ्यांनी धोरण नीट वाचावे, त्यामागचा उद्देश समजून घ्यावा. अन्यथा अशा चुकीच्या विधानांनी महाराष्ट्राच्या भाषिक सौहार्दाला तडे जाऊ शकतात. विशेषत: अशा संवेदनशील विषयांवर गैरसमज पसरवणे हे सामाजिक सौहार्दासाठी धोकादायक ठरू शकते. ■

# पाचोऱ्यात भाजपा सदस्य नोंदणी अभियान उत्साहात

**भारतीय** जनता पार्टीच्या पाचोरा शहर शाखेच्यावतीने आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून, शहरात सदस्य नोंदणी अभियानाचे भव्य आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात भाजपचे ज्येष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये विशेषतः संजय वाघ, मधुकर काटे, व्ही. टी. जोशी, सुभाष पाटील, प्रदीप पाटील, डॉ. शांतीलाल तेली, रमेश वाणी, नंदू सोमवंशी, शिवदास पाटील, वासुदेव माळी, सुदाम वाघ, हारूण देशमुख, सतीश चौधरी, अशोक मोरे, शरद पाटील, भूषण वाघ, निलेश पाटील, सुरज वाघ, बंटी महाजन ,अमोल ठाकूर, विनोद पाटील, भगवान मिस्तरी, बंडू नाना, ॲड. ललित सुतार, सुनील पाटील, हरीश पाटील, अनिल पाटील, वाजिद बागवान, ए. जे. महाजन, बंटी पाटील, गणेश पाटील, विशाल पाटील यांचा समावेश होता. या कार्यक्रमात महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांचीही लक्षणीय उपस्थिती होती. महिला नेतृत्वाचा सशक्त प्रत्यय देणाऱ्या सुचेता वाघ, ज्योती वाघ, प्रमिला वाघ, सरला पाटील, जयश्री मिस्त्री, सुरेखा पाटील, दीपमाला पाटील यांनी विशेष सहभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यावेळी मार्गदर्शन करताना दिलीप वाघ यांनी मार्गदर्शन केले. ■

# स्व.बंडोपंत जोशी यांच्या स्मृतीदिनी भाजपातर्फे अभिवादन

**ज्येष्ठ** नेते प्रभाकर शंकर उर्फ बंडोपंत जोशी यांचा स्मृतीदिन महानगर भाजपा कार्यालयात प्रशांत जाधव, मध्य मंडल अध्यक्ष वसंत उशीर, देवदत्त जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते बंडोपंतांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. महानगर भाजपाच्या उभारणीत आणि कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण करण्यात बंडोपंतांचे योगदान मोलाचे आहे. भाजपा हा पक्ष भरलेल्या कुटुंबासारखा कायम कार्यकर्त्यांनी भरलेला असावा यासाठी ते कायम आग्रही असायचे. कार्यकर्ता हेरून त्याला पक्षाच्या प्रवाहात आणून त्यांला घडविण्याचे काम बंडोपंतांनी केले. त्यांनी सतत कार्यकर्त्यांचा सन्मान बाळगून त्यांना मोठे करण्याचा प्रयत्न केला.ज्या काळात भाजपात येण्यास कुणी धजावत नव्हते अशा काळात पक्षाची विचारधारा पटवून देवून कार्यकर्त्यांना पक्षात आणण्यास त्यांनी आपले सर्वस्व पणास लावले. आज पक्षाचा मोठ्या प्रमाणात जो विस्तार झाला आहे त्याचे श्रेय बंडोपंतांच्या शिस्तबद्ध नियोजननितीलाच द्यावे लागेल, असे श्री. जाधव यांनी सांगितले. यावेळी अमित घुगे, शैलेश जुन्नरे, सुजाता करजगीकर, उदय जोशी, दिगंबर धुमाळ, राजेंद्र मोरे, संगीता जाधव, अनिता भामरे, रविंद्र गांगुर्डे, ऋषिकेश डापसे आदी उपस्थित होते. ■

# विजेचे दर 10 टक्क्यांनी कमी होणार

**दरमहा** १०० युनिट्सपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांच्या वीजदरात एक जुलैपासून १० टक्के कपात होणार असून त्याहून अधिक वीजवापर असलेल्या मध्यमवर्गीय घरगुती आणि वाणिज्यिक, औद्योगिक वीजग्राहकांसाठी एक ते तीन टक्के इतकी किरकोळ दरकपात करण्यात आली आहे. सर्व संवर्गातील ग्राहकांच्या वीजदरात पुढील पाच वर्षे दरकपात करण्याचा आदेश राज्य वीज नियामक आयोगाने दिला आहे. पुढील काही वर्षात सौर वीज प्रकल्पांद्वारे मोठ्या प्रमाणावर तीन ते साडेतीन रुपये प्रतियुनिट दराने स्वस्त वीज उपलब्ध होणार असल्याने वीजेचे दर विविध संवर्गांसाठी टप्प्याटप्प्याने कमी होणार आहेत. आयोगाने २९ मार्च रोजी एक एप्रिलपासूनचे नवीन वीजदर जाहीर केले होते. महावितरणने ४८ हजार कोटी रुपयांची तूट येणार असल्याने वित्तीय ताळेबंदातून आयोगापुढे मांडण्यात आले होते व त्यानुसार महसूल वाढ देण्याची मागणी महावितरणने केली होती. मात्र आयोगाने ती मान्य न करता ४४ हजार ५०० कोटी रुपये शिल्लक राहील, असे गृहीत धरले होते.

**१ जुलै पासून घरगुती ग्राहकांसाठीचे वीजदर प्रति युनिट रुपयांमध्ये**

| दरमहा वीजवापर | २०२४-२५ (सध्याचा) | २०२५-२६ (नवीन) |
|---|---|---|
| ०-१०० युनिट्स | ८.१४ | ७.३१ |
| १०१-३०० | १३.२३ | १३.१७ |
| ३०१-५०० | १७.७८ | १७.५६ |
| ५००+ | १९.२३ | १९.१५ |

आयोगाच्या निर्णयामुळे महावितरणला मोठा आर्थिक ताण येईल, असे नमूद करुन आयोगाच्या निर्णयातील विविध मुद्द्यांना आक्षेप घेत महावितरणने फेरविचार याचिका सादर केली होती. त्यावर आयोगाने आपल्या आधीच्या आदेशात सुधारणा करीत महावितरणच्या मागण्या मान्य करुन महसूल वाढ होण्याच्या दृष्टीने आदेश जारी केले आहेत. मात्र ग्राहकांना दरकपातीचा दिलासा मिळणार आहे. महावितरणने मुंबईतील काही भागात तर अदानी व टोरेंट या खासगी वीज कंपन्यांनी एकमेकांच्या परवानाक्षेत्रात वितरण परवाना मिळविण्यासाठी आयोगापुढे याचिका सादर केल्या आहेत. त्यातून ग्राहकांना स्वस्त वीजदरांची स्पर्धा सुरु होण्याची शक्यता वर्तविली जात होती. त्यानुसार महावितरणचे वीजदर टप्प्याटप्प्याने सर्व संवर्गातील ग्राहकांसाठी कमी होणार आहेत.

राज्याच्या इतिहासात प्रथमच वीजदरात कपातीचा प्रस्ताव महावितरणकडून सादर झाला होता. स्मार्ट मीटर बसविणाऱ्या घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरासाठी दहा टक्के अतिरिक्त टीओडी सवलत आणि सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रोत्साहन देण्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. वीजदर कमी करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेतून १६ हजार मेगावॉट इतकी वीज सरासरी ३ रुपये प्रती युनिट इतक्या कमी दराने वीज उपलब्ध होणार आहे.

डिसेंबर २०२६ पर्यंत योजना पूर्ण होणे अपेक्षित आहे. शेतकऱ्यांना दिलासा देतानाच महावितरणच्या वीजखरेदी खर्चात कपात करण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरली आहे. महावितरणने भविष्यातील वीजेची गरज ध्यानात घेऊन २०३० पर्यंत राज्याची वीज पुरवठ्याची क्षमता ८१ हजार मेगावॅट होण्यासाठी ४५ हजार मेगावॅटचे वीजखरेदी करार केले आहेत. त्यापैकी ३१ हजार मेगावॅट वीज अपारंपारिक स्त्रोतांद्वारे मिळणार आहे. ही वीज अत्यंत किफायतशीर दरात मिळणार असल्याने आगामी पाच वर्षात महावितरणचे वीजखरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार आहेत. त्यामुळे महावितरणने वीजदर कपातीचा प्रस्ताव आयोगापुढे मांडल्याचे उच्चपदस्थांनी सांगितले. राज्याच्या इतिहासात प्रथमच पहिल्यावर्षी १० टक्के आणि टप्प्याटप्प्याने कपात करीत ५ वर्षांत २६ टक्के वीजदर कमी होणार आहेत. पूर्वी १० टक्के वीजदरवाढीच्या याचिका सादर होत होत्या. पण, राज्याच्या इतिहासात प्रथमच महावितरणने वीजदर कमी करण्यासाठी याचिका केली व त्यावर आयोगाने आदेश दिला आहे. घरगुती, औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांचेही वीजदर कमी होणार आहेत. राज्यात १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणार्यांचे प्रमाण ७० टक्के असून त्यांच्यासाठी सर्वाधिक म्हणजे १० टक्के इतके वीजदर कमी होतील. ■

# महानिर्मिती राज्यात उभारणार १०७१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प

## ■ राज्यातील तीन लाख शेतकऱ्यांना लाभ होणार

**पारंपरिक** ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून कार्बन उत्सर्जन घटवून शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित वीज पुरवठा देऊन शेतीची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी शासन विविध योजना राबवित आहे. राज्यात शाश्वत विकासास चालना देण्यासाठी महानिर्मितीतर्फे १ हजार ०७१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प 'मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प २.०' अंतर्गत लवकरच कार्यान्वित होणार आहेत. या प्रकल्पांमुळे राज्यातील तीन लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे.

### महानिर्मिती(महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि.)

महानिर्मिती ही म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी मर्यादित या कंपनीची संपूर्ण मालकीची उपकंपनी असून, सुमारे १३,८८० मेगावॅट क्षमतेसह भारतातील सर्वात मोठ्या राज्य-नियंत्रित विद्युत उत्पादकांपैकी एक आहे. नॅशनल थर्मल पॉवर कंपनी नंतर (NTPC) ही देशातील दुसऱ्या क्रमांकाची राज्य मालकीची जनरेशन कंपनी आहे. औष्णिक, वायू, जल विद्युत आणि सौर असे ऊर्जा उत्पादन क्षेत्रात वैविध्य असलेली महानिर्मिती ही कंपनी नवीकरणीय ऊर्जेचे प्रकल्प सुरू करत आहे, ज्यामुळे वीज ग्राहकांना कमी दरात वीजपुरवठा करत कार्बन उत्सर्जनात घट होण्यास मदत होणार आहे.

द रॉकफेलर फाउंडेशन (The Rockefeller Foundation),इकीया फाउंडेशन (IKE Foundation) आणि बेझॉज अर्थ फंड (Bezos Earth Fund) यांच्या सहकार्याने स्थापन झालेली जीईएपीपी इंडिया (ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट) ही संस्था विकसनशील देशांमध्ये न्याय्य, समतोल व वेगवान हरित ऊर्जेसाठी मदत करते. जीईएपीपी इंडिया ही जीईएपीपी एलएलसीची भारतीय शाखा असून, भारतात विशेषतः वितरणक्षम ऊर्जेसाठी उपयुक्त उपक्रमांची अंमलबजावणी करत आहे.

### मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०

पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून कार्बन उत्सर्जन घटवून शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित वीज पुरवठा देऊन शेतीची उत्पादनक्षमता वाढविणे हे राज्य शासनाचे ध्येय आहे. कृषी ग्राहकांच्या सेवाखर्चात कपात करून शाश्वत ऊर्जेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० आहे. यातून वितरित पद्धतीने नवीकरणीय ऊर्जा वापरून कृषी वापरासाठी सौर प्रकल्प जोडण्यात येतात. सन २०२५ पर्यंत सुमारे ३०% फीडरचे सोलरायझेशनचे उद्दिष्ट 'मिशन २०२५' म्हणून निश्चित केले आहे, ज्यामध्ये शेतक-यांना दिवसा वीज देण्यासाठी ०.५ मेगावॅट ते २५ मेगावॅट क्षमतेचा कृषी भार असलेल्या वितरण उपकेंद्रापासून ५-१० किमी परिघात विकेंद्रित सौर प्रकल्प उभारले जातात. जीईपीपी इंडिया हा प्रकल्प प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रकल्प मॉनिटरिंग युनिट (PMU) सुविधा आणि एक डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध करत आहे, माहितीचे संकलन, या प्रकल्पाची सद्यस्थिती आणि प्रकल्पांचे सुलभ व्यवस्थापन शक्य होईल. जीईपीपीच्या तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचा उपयोग करून मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प २.०ची प्रभावी अंमलबजावणी करणे. महाराष्ट्रात शाश्वत विकासास चालना देणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. हे सौर ऊर्जा प्रकल्प वेळेत पूर्ण करणे करता धोरणात्मक संयुक्त समिती स्थापन करण्यात येणार असून ही समिती मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेबाबत मार्गदर्शन करेल.

या समितीमध्ये सर्व सहभागधारक यांचा समावेश असणार आहे. जीईएपीपी इंडिया (ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅने व महानिर्मितीतर्फे सेंट्रल डॅश बोर्ड तयार करण्यात येणार असून यामार्फत जमीन संपादन ते प्रकल्प उभारणी प्रगती यांचे दैनंदिन तत्वावर अवलोकन करण्यात येणार आहे. ■

पाक्षिक मनोगत प्रदेश बीजेपी

# महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्गाला गती

## ■ २० हजार ७८७ कोटींची तरतूद; राज्यातील १२ जिल्ह्यांना जोडणारा ८०२ कि.मी.चा द्रूतगती मार्ग



**राज्याच्या** पूर्वेकडील पवनार (जि.वर्धा) येथून ते पश्चिमेकडील पत्रादेवी (जि.सिंधुदुर्ग) या महाराष्ट्र–गोवा सीमेला जोडणाऱ्या महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग (शिघ्रसंचार द्रूतगती मार्ग) प्रकल्पाला गती देण्यासाठी २० हजार ७८७ कोटी रुपयांच्या तरतुदीस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यातील १२ जिल्ह्यांना जोडणारा हा द्रूतगती मार्ग ८०२.५९२ किलोमीटर लांबीचा असणार आहे.

महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग राज्यातील वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर व सिंधुदुर्ग या १२ जिल्ह्यांना जोडणार आहे. पुढे तो कोकण द्रूतगती महामार्गास गोवा–महाराष्ट्र सीमेवर जोडला जाणार आहे. या महामार्गामुळे राज्यातील प्रमुख शक्तीपीठे माहुर, तुळजापूर व कोल्हापूर तसेच अंबेजोगाई ही तीर्थक्षेत्रे जोडली जाणार आहेत. तसेच संतांची कर्मभूमि असलेले मराठीचे आद्यकवी अंबेजोगाईस्थित मुकूंदराज स्वामी, जोगाई देवी तसेच १२ ज्योतिर्लिंगांपैकी २ औंढानागनाथ व परळी वैजनाथ, महाराष्ट्राचे आराध्य पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, यासह कारंजा–लाड, अक्कलकोट, गाणगापूर, नरसोबाची वाडी, औदुंबर ही दत्त गुरूंची धार्मिक स्थळे जोडली जाणार आहेत. या महामार्गामुळे नागपूर ते गोवा हे १८ तासांच्या प्रवासाचे अंतर ८ तासांवर येणार आहे.

या प्रकल्पाच्या भूसंपादनाकरिता हुडकोकडून १२ हजार कोटींचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. या निधीतून सुमारे ७ हजार ५०० हेक्टरचे भूसंपादन करण्यात येणार आहे. हा संपूर्ण प्रकल्प महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणार आहे. हा महामार्ग महाराष्ट्रातील शक्तीपीठांना एकत्र जोडण्याचा प्रयत्न असून, त्यातून पर्यटन, वाहतूक व ग्रामीण भागाचा विकास साधण्याचे उद्दिष्ट आहे. ■

# केंद्र सरकारने सुरु केले नाविन्यपूर्ण 'स्टार्टअप चॅलेंज'

**केंद्र** सरकारने देशात रूफटॉप सोलर (RTS) आणि डिस्ट्रिब्युटेड रिन्युएबल एनर्जी (DRE) तंत्रज्ञानात नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी २.३ कोटी रुपयांच्या पारितोषिक पूलसह एक नाविन्यपूर्ण 'स्टार्टअप चॅलेंज' सुरू केला आहे. या अनोख्या राष्ट्रीय नवकल्पना स्पर्धेचे उद्दिष्ट भारतातील RTS आणि DRE इकोसिस्टमसाठी प्रभावी उपाय शोधणे आणि त्यांना पाठिंबा देणे आहे. हा चॅलेंज नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय (MNRE) अंतर्गत राष्ट्रीय सौर ऊर्जा संस्था (NISE) च्या सहकार्याने आणि स्टार्टअप इंडिया व DPIIT च्या समन्वयातून राबवला जात आहे. या स्पर्धेत निवडलेले इनोव्हेटर्स २.३ कोटी रुपयांच्या एकूण पारितोषिकांसाठी स्पर्धा करतील: पहिला क्रमांक – १ कोटी रुपये, दुसरा क्रमांक – ५० लाख रुपये, तिसरा क्रमांक – ३० लाख रुपये, याशिवाय, ५ लाख रुपयांचे १० सांत्वन पुरस्कार दिले जातील. MNRE च्या निवेदनानुसार, विजेत्यांना MNRE आणि NISE कडून इनक्युबेशन सपोर्ट, प्रायोगिक अंमलबजावणीची संधी, तसेच डोमेन एक्स्पर्ट्स व गुंतवणूकदारांकडून मार्गदर्शन मिळणार आहे.

अर्ज करण्याची अंतिम तारीख २० ऑगस्ट असून, परिणाम १० सप्टेंबर रोजी जाहीर केले जातील. ही स्पर्धा भारतामधील इनोव्हेटर्स आणि स्टार्टअप्सना आपले उपाय सादर करण्यासाठी आमंत्रित करते. हिचा उद्देश नवीकरणीय ऊर्जेचा स्वीकार वाढवण्यासाठी चार प्रमुख श्रेणींवर केंद्रित आहे – वहनीयता, लवचिकता, समावेशकता, आणि पर्यावरणीय शाश्वतता.

- ९ वहनीयता – कमी व मध्यम उत्पन्न गटांसाठी सुलभ वित्तीय उपाय, मॉड्युलर सिस्टम्स व सर्क्युलर इकॉनॉमीद्वारे RTS परवडणारे बनवणे.
- ९ लवचिकता – विशेषतः दूरदराजच्या आणि संवेदनशील भागांतील सौर पायाभूत सुविधांची हवामान सहनशक्ती, ग्रिड स्थैर्य आणि सायबर सुरक्षा वाढवणे.
- ९ समावेशकता – वंचित समुदायांसाठी कम्युनिटी सोलर, वर्चुअल नेट मीटरिंग आणि समावेशक आर्थिक मॉडेलद्वारे सौर ऊर्जेची उपलब्धता वाढवणे.
- ९ पर्यावरणीय शाश्वतता – सौर पॅनल रिसायकलिंग, जमिनीचा कमी वापर करणारी सौर तंत्रे, आणि स्वच्छ ऊर्जा हायब्रिड मॉडेल्सना प्रोत्साहन. ■

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' मध्ये जुन्नरच्या रमेश खरमाळे आणि पाटोदा ग्रामपंचायतीच्या कामाचा केला गौरव

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २९ जून रोजी झालेल्या 'मन की बात' कार्यक्रमात पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथील रमेश खरमाळे आणि छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील पाटोदा ग्रामपंचायतीने केलेल्या पर्यावरण रक्षणाच्या कामाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. पंतप्रधान मोदी म्हणाले की, या महिन्यात आपण जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अनेक उपक्रम केले. अनेकांनी आपल्या परिसरातील पर्यावरण रक्षणासाठी एकट्याने प्रयत्न करणाऱ्या लोकांची माहिती दिली. पुणे जिल्ह्यातील रमेश खरमाळे यांनी पर्यावरण रक्षणासंदर्भात केलेले कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. आठवड्याच्या अखेरीस जेव्हा बहुतेक लोकं घरी बसून आराम करणे पसंत करत असतात तेव्हा रमेश खरमाळे आणि त्यांचे कुटुंबीय कुदळ, फावडे घेऊन घराबाहेर पडतात. खरमाळे कुटुंबीय जुन्नर परिसरातील डोंगरांमध्ये जातात आणि जमिनीत पाणी मुरवण्यासाठी चर खणतात, बिया लावतात. फक्त २ महिन्यांमध्ये त्यांनी ७० चर खणले आहेत. खरमाळे यांनी अनेक लहान लहान तळी तयार केली आहेत, शेकडो झाडे लावली आहेत. श्री. खरमाळे हे एक ऑक्सिजन पार्क देखील उभारत आहेत. या सगळ्याचा परिणाम असा झाला की या भागात पक्षी परतू लागले आहेत. वन्यजीवनाला नवीन आयुष्य लाभले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात 'पाटोदा' ही कार्बन मुक्त (कार्बन न्यूट्रल) ग्रामपंचायत आहे. या गावात कोणीही स्वतःच्या घराबाहेर कचरा फेकत नाही. प्रत्येक घरातून कचरा संकलित करण्याची चोख व्यवस्था केलेली आहे. या गावात सांडपाण्यावर प्रक्रियाही करण्यात येते. ■

# नागपुरात होणार फाल्कन 2000 जेट निर्मिती!

## फाल्कन २००० जेट निर्मितीचा करार! 'मेक इन इंडिया' चे आणखी एक पुढचे पाऊल



**पॅरिस** एअर शोमध्ये झालेला डसॉल्ट एव्हिएशन आणि रिलायन्स एरोस्पेस लिमिटेड यांच्यातील करार हा केवळ एक औद्योगिक करार नसून, तो भारताच्या आत्मनिर्भरतेच्या दिशेने उचललेलं महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक पाऊल आहे.

फाल्कन– २००० या उच्च दर्जाच्या बिझनेस जेटची संपूर्ण निर्मिती आता महाराष्ट्रातील नागपूरमध्ये होणार आहे आणि यामुळे भारत थेट जागतिक एरोस्पेस निर्मितीच्या नकाशावर झळकणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यांनी या कराराचं स्वागत केलं आहे, त्यामागे त्यांची दीर्घदृष्टी आणि नागपूरच्या औद्योगिक पायाभूत सुविधा मजबूत करण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. मिहानसारख्या प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणावर संरक्षण व एरोस्पेस उत्पादनासाठी आधारभूत सुविधा निर्माण केल्या, ज्यामुळे आज असे ऐतिहासिक करार शक्य झाले आहेत.

### या कराराचे ठळक वैशिष्ट्ये

- फाल्कन २००० जेटची संपूर्ण निर्मिती भारतात प्रथमच होणार.
- नागपूरच्या मिहानमध्ये फॅक्टरी: जागतिक दर्जाचं उत्पादन केंद्र म्हणून उभारणी.
- २०२८ पर्यंत पहिला मेड इन इंडिया फाल्कन, हे एक माईलस्टोन ठरेल.
- डसॉल्ट रिलायन्स एरोस्पेस (DRL) हे 'सेंटर ऑफ एक्सलन्स' म्हणून विकसित होणार आहे.
- फाल्कन 8X आणि 6X जेटसची असेम्ब्ली सुद्धा नागपूर मध्येच होणार! नागपूर हे भविष्यात एव्हिएशन हब बनणार.
- हजारो अभियंते व तंत्रज्ञांना रोजगार उपलब्ध तर होईलच त्याबरोबर स्थानिक कौशल्याला प्रोत्साहन सुद्धा मिळेल.
- या करारामुळे भारत, फ्रान्स, अमेरिका, ब्राझीलच्या यादीत गेला. या करारामुळे भारत एव्हिएशन उत्पादक देशांच्या यादीत पोहोचणार आहे. अमेरिका, फ्रान्स, कॅनडा, ब्राझीलसारख्या देशांबरोबर आता भारताचं नावही या प्रगत विमाननिर्मितीच्या यादीत घेतलं जाईल.

### मोदीजीनी पाहिलेला 'मेक इन इंडिया' साकार होत आहे

अडसॉल्टसारखी कंपनी जेव्हा भारतात संपूर्ण उत्पादनासाठी पाऊल टाकते, तेव्हा हे केवळ एक व्यावसायिक निर्णय नसतो, तर भारताच्या स्थिर धोरणांवरील विश्वासाचे प्रतीक असते. 'मेक इन इंडिया', 'डिफेन्स मेन्युफॅक्चरिंग', 'आत्मनिर्भर भारत' या योजना आता प्रत्यक्षात यशस्वी होत आहेत.

### राफेल ते फाल्कन भारतातली विश्वासार्हता

अडसॉल्ट हीच ती कंपनी आहे जी भारतीय वायुदलासाठी राफेलसारखं आधुनिक फायटर विमान बनवते. आता त्यांनी नागपूरला पसंती देणं म्हणजे भारतातल्या सुरक्षिततेच्या, कामाच्या गुणवत्तेच्या आणि धोरणात्मक स्थैर्याच्या प्रतिमेवर त्यांचा विश्वास दृढ झाला आहे. ■

# आणिबाणीत कारावास भोगलेल्या कार्यकर्त्यांचा सन्मान








डोंबिवली– मंगला कुलकर्णी, शशिकांत कर्डेकर, अभय राजहंस, मुकुंद कुलकर्णी, श्रीपाद जोशी, मोहन दातार, प्रकाश भुर्के, भालचंद्र लोहकरे, प्रमोद काणे, वसंतराव शेळके, सुनील कुलकर्णी, वसंत देशपांडे, प्रसाद कांत, उमेश पटवारी यांचा सत्कार– उपस्थिती– प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण, सुरेश पुराणिक काका, चंद्रकांत (चंदू) जोशी, जगन्नाथ पाटील, कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब, अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश सरचिटणीस शशिकांत कांबळे, मुकुंद (विशू) पेडणेकर, दिनेश दुबे, संजीव बिडवाडकर, रामेन्द्र प्रकाश मिश्रा आदी.



सांगली– उपस्थिती– आ.सुधीर गाडगीळ, प्रकाश बिरजे, श्रीकांत शिंदे, महिला मोर्चा प्रदेश सरचिटणीस स्वाती शिंदे, जिल्हा सरचिटणीस विश्वजीत पाटील, अविनाश मोहिते, मोहन वाटवे, गीता पवार, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष गीतांजली ढोपे–पाटील, जिल्हा उपाध्यक्ष हेमलता मोरे, ईशा साठे आदी.



धाराशिव– सुचिता दैठणकर, श्रीहरी आचार्य, सुमनबाई भोसले, सिंधू भोसले, लक्ष्मीबाई मोगरकर, विमल व्हटकर, शेषाबाई शिंदे, पद्मिनी बामनकर, बलभीम मुळे, हरदास वडणे, बाबुराव कदम यांचा सत्कार– उपस्थिती– ज्येष्ठ नेते दत्ताभाऊ राजमाने, ॲड. नितीन भोसले, युवराज नळे, राजसिंहा राजेनिंबाळकर, नंदाताई पुनगुडे आदी.

# आणिबाणीत कारावास भोगलेल्या कार्यकर्त्यांचा सन्मान



मुंबई– उपस्थिती– श्रीपाद मुळसे यांचा सन्मान– उपस्थिती– राज्यपाल सीपी राधाकृष्ण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माहिती व तंत्रज्ञान मंत्री व मुंबई अध्यक्ष आशिष शेलार, विधानपरिषद उपसभापती निलम गोऱ्हे आदी.



बाळा काणेकर यांचा मुंबई उपजिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान




पुणे– उपस्थिती– राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक सुहासराव हिरेमठ, माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, आ. योगेश टिळेकर, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खा. डॉ. मेधा कुलकर्णी, आ. भीमराव तापकीर, आ. सुनिल कांबळे, आ. हेमंत रासने, माजी आ. जगदीश मुळीक, शहराध्यक्ष धीरज घाटे आदी.




अमरावती– उपस्थिती– ओबीसी मोर्चा सरचिटणीस गजानन कोल्हे, माजी आमदार प्रभूदास भिलावेकर, ओबीसी आघाडीचे सरचिटणीस रुपेश ढेपे, जिल्हा संयोजक कमालकांत लाडोळे, माजी नगराध्यक्ष मंजुषा लोळे, जिल्हा सरचिटणीस ॲड.पद्माकर सांगोळे, गणेश पिंगे, सुधीर रसे, विक्रम पाठक, शहराध्यक्ष मनिष मेन, विनोद दुर्गे, गजानन लेन्धे, राजेंद्र रेखाते, आशिष टिपरे, निलेश पाटील, देवानंद टांक, सतिश वानखडे, अविनाश पवार, श्याम गुजर, सविताताई बोबडे, दिपाली पवार, हेमा लेन्धे, शितल बलंगे, शीला सगणे आदी.




सिंधुदुर्ग– उपस्थिती– प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत आदी.



नांदेड– उपस्थिती– महिला व बाल विकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आ. श्रीजया चव्हाण, महानगराध्यक्ष अमर राजुरकर, प्रविण साले आदी.




उत्तर मुंबई चित्र प्रदर्शनी– उपस्थिती– एस.एस. गुप्ता, माजी खासदार गोपाळ शेट्टी, आ. योगेश सागर, आ.मनिषा चौधरी, जिल्हाध्यक्ष दीपक तावडे आदी.




प्रदेश कार्यालयात चित्र प्रदर्शनी आयोजन– उपस्थिती– राष्ट्रीय सह संघटनमंत्री शिवप्रकाश, खा. डॉ.भागवत कराड, प्रदेश सह कोषाध्यक्ष अरुण लखानी, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी आदी.



सांगोला– उपस्थिती– प्रदेश उपाध्यक्ष सुनिल कर्जतकर, सोलापूर (प.) जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार–सावंत, जिल्हा सरचिटणीस सचिन शिंदे, गणेश चिवटे, संदेश काकडे, जिल्हा उपाध्यक्ष संभाजी आलदर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष शिवराज पुकळे, सचिन पिसाळ, काकासाहेब सरडे, बार्शी शहराध्यक्ष महावीर कदम, मदन दराडे, अविनाश गोरे, संजय देशमुख, सुजयसिंह माने पाटील, दुर्योधन हिप्परकर, विजय बाबर आदी.




हिंगोली चित्र प्रदर्शनी– उपस्थिती– जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, फुलाजीराव शिंदे, बाबारावजी बांगर, शशिकांत वडकुते, मिलींद भाऊ यंबल, उमेश गुट्टे, राजु भाऊ यादव, आशिष जयस्वाल, शहराध्यक्ष रजनिश पुरोहीत, माणिकराव लोडे, शाम खंडेलवाल, पहेलवान ॲड. अमोल जाधव, नंदकिशोर खिल्लारे, सुनिता मुळे, ज्योती वाघमारे, कृष्णा रुहाटिया, मनोज शर्मा, बाबा घुगे आदी.




जालना– उपस्थिती– खा.डॉ. भागवत कराड, माजी आमदार विलास बापू खरात, दिपकसिंह ठाकूर, ॲड.आर.आर कुलकर्णी आदी.




सिंधुदुर्ग– उपस्थिती– पालकमंत्री नितेश राणे, जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत, डॉ. मिलिंद कुलकर्णी, मनोज रावराणे, युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस लखम राजे भोसले, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संदीप मेस्त्री, नगराध्यक्ष समीर नलावडे, महिला जिल्हाध्यक्ष श्वेता कोरगावकर, मिलिंद मेस्त्री, दिलीप तळेकर, सुधीर नकाशे, संजना सावंत, नामदेव जाधव आदी.

उंडणगाव (ता. सिल्लोड)– अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुल्तानी, मंडल अध्यक्ष आत्माराम पाडाळे, माजी जिल्हा परिषद सदस्य गजानन राऊत, अनिल खरात, विठ्ठल वानखेडे, किशोर गवळे, रुखमण लांडगे, संतोष शिंदे, सरपंच लक्ष्मण पाटील, ज्ञानेश्वर इंगळे, दिलीप पाटील, गजानन दांडगे, महेंद्र सुरडकर, सार्थक खुल्लोडकर.






पंढरपूर– उपस्थिती– ज्येष्ठ नेते रघुनाथ कुलकर्णी, आ. समाधान आवताडे, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, ज्येष्ठ नेते प्रा.चांगदेव कांबळे, मंडल अध्यक्ष हर्षल कदम, माऊली हळनवर, बाबासाहेब बडवे, शकुंतला नडगिरे, प्राजक्ता बेणारे, अपर्णा तारखे, बादलसिंग ठाकूर, गजेंद्र पवार, बालाजी वाघमारे आदी.




माटुंगा (मुंबई)– उपस्थिती– आ. प्रसाद लाड, आ.तमिल सेल्वन, ज्येष्ठ नेते रवी राजा, दक्षिण मध्य मुंबई जिल्हाध्यक्ष निरज उभारे, राजेश्री शिरवडकर, श्वेता परुळकर आदी.




जळगाव– उपस्थिती– अमोल नाना पाटील, राधेश्याम चौधरी, अमोल जावळे, माजी जिप उपाध्यक्ष लालचंद पाटील, गोपाल भंगाळे, गिरीश वराडे, संदिप पाटील, ललित बऱ्हाटे, मिलींद चौधरी, ॲड.योगेश पाटील, ॲड.दिपक पाटील, संजय चौधरी, तुळशीराम सोनवणे, गोरख कोळी, भूषण पाटील, भूषण बाविस्कर, मयूर पाटील,भगवान सोनवणे, सुरज पाटील, संदीप भावसार, परेश महाजन आदी.

# माजी आमदार अपूर्व हिरे, प्रवीण माने, अनिल मादनाईक भाजपामध्ये





माजी आमदार अपूर्व हिरे, प्रवीण माने, अनिल मादनाईक यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आ. सीमा हिरे, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, राजेश पांडे, विजय चौधरी, ज्येष्ठ नेते सुरेश हाळवणकर, खा. धनंजय महाडिक, आ. अमल महाडिक, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.



आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयात योगशिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजपा अध्यात्मिक समन्वय आघाडीचे प्रदेश योगप्रमुख योगीराज भारत भूषण यांनी योगसाधनेचे महत्व विषद करत विविध योगाभ्यास करवून घेतला. या कार्यक्रमात प्रदेश प्रवक्ते अतुल शाह, मोहन बने, कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी, कार्यालय सह सचिव भरत राऊत, कार्यालय कर्मचारी सहभागी झाले होते.




मालेगाव वकील बार संघाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार– उपस्थिती– ज्येष्ठ नेते प्रसाद हिरे, जिल्हाध्यक्ष प्रा. निलेश कचवे, मंडल अध्यक्ष देवा पाटील, माजी जिल्हाध्यक्ष दादासाहेब जाधव, भरत पोफळे, जिल्हा सरचिटणीस कमलेश निकम आदी.

# पक्ष प्रवेश

धुळे ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे माजी आमदार कुणाल पाटील यांचा प्रवेश- उपस्थिती- रवींद्र चव्हाण, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरिश महाजन, धुळ्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी आदी.











ज्येष्ठ काँग्रेस नेते रावसाहेब पाटील, उबाठा पुणे महिला आघाडीच्या कस्तुरी पाटील, रासपा व्यापारी आघाडीचे नेते प्रवीणकुमार शाह, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे सोशल मीडिया प्रमुख प्रशांत कुंभोजे, सुरज अथने यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी मंत्री सुरेश खाडे आदी.



कवठेमहंकाळ नगरपंचायतीचे अपक्ष नगराध्यक्ष रणजीत घाडगे, माजी नगराध्यक्ष राहुल गावडे, सभापती ईश्वर वनखंडे, नगरसेवक संजय माने, कलहट्टी ग्रामपंचायतीचे सरपंच मच्छिंद्र हजारे, उपसरपंच अजितराव ओलेकर, सदस्य भारत पांढरे, गणपती मासाळ, अक्षय हाके, दादासाहेब वाघमारे यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आ.रवींद्र चव्हाण, उच्च शिक्षण व तंत्रज्ञान मंत्री चंद्रकांत पाटील, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपूरे, आ.गोपीचंद पडळकर, खा. डॉ.भागवत कराड, माजी आमदार पृथ्वीराज देशमुख, संदीप गिड्डे आदी.



अखिल भारतीय कामगार सेनेचे माजी सरचिटणीस आणि माथाडी कामगार सेनेचे कार्याध्यक्ष डॉ. प्रशांत काकडे, भारतीय कामगार सेनेचे शेखर पवार, काँग्रेसचे गिरीश मसुरकर, विजय हरिहर, बाबूलाल हरिहर यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, अखिल भारतीय कर्मचारी महासंघाचे सुहास माटे, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp













प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com